

TITUTE OF
CED STUDY
RY SIMLA



MR
891.46
R 261 M

MR 891.46
R 261 M

# म न वा

पु० शि० रेगे

पुरुषोत्तम शिवराम रेगे

पंधरा गोष्टी

# म | न | वा

मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

Library IIAS, Shimla
H 891.46 R 261 M
00055429

55429
11.11.76

MR891.46
R 261 M

मौज प्रकाशन : १६५

पहिली आवृत्ती : १९६८

© १९६८, पु० शि० रेगे

किंमत चार रुपये

वेष्टण

गजानन भागवत

प्रकाशक

वि० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

मुद्रक

वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

माझ्या आरंभींच्या साहित्याचे

बोलविते धणी

श्री० वा० रा० ढवळे

यांस प्रेमपूर्वक

" तुमच्या सहवासाचीं अडतीस वर्षे कशीं गेलीं
तें कळलेंहि नाहीं. अशींच आणखी
पुष्कळ जावोत. "

पु० शि० रेगे

जून १९६८

प्रस्तावना नऊ

मनू १
गोष्ट २६
सुप्रिया २९
क्विन्दो ३१
अमित्रा ३४
अनुराधा ४०
पल्लवी ४५
देहस्विनी ५०
सावित्रीं ५४
शेवट ५७
कादंबरी ६०
रुखमण ६४
विपर्ययः स्त्रीपूर्वकः ७१
दक्षा ७७

साक्ष ८२

# प्रस्तावना

तसें पाहिलें तर लहानपणीं मी गोष्टी[1] आणि नाटकेंच पहिल्यांदा लिहिलीं. कवितेची ओढ नंतरची— पंधरावें, सोळावें वर्ष लागल्या-नंतरची. आमच्या कांहीं शेजारी विद्यार्थीमित्रांच्या साहाय्यानें आम्हीं 'बालमित्र' नांवाचें हस्तलिखित मासिक काढीत असूं. माझे वडील भाऊ, कै० डॉ० जगन्नाथ, त्याचे व्यवस्थापक व लेखक होते आणि वडोद्याला त्यावेळीं कलाभवनांत शिकत असलेले एक आतेभाऊ, श्री० पु० भ० टेंबुलकर, संपादक होते. 'संपादक बाबुराव' असें या मासिकावर आम्हीं लिहित असूं, कारण घरीं त्यांना हेंच नांव होतें. आमच्या मानानें ते थोडे अधिक वडील व साहित्याची आवड व जाण असणारे. 'बालमित्रा'कडे येणारे सर्व लेख त्यांच्याकडे जात व ते ते दुरुस्त करून पाठवीत असत.

'बालमित्रां'त मी 'चिनी भाषेंतील अद्भुत कथा' म्हणून एक कथामाला लिहिली होती. त्यांतील कथा आतां फारशा आठवत नाहींत; बहुधा त्या अरबी भाषेंतील सुरस आणि चमत्कारिक कथांच्या वाचनानें स्फुरल्या असाव्यात. 'बालमित्रां'तील दहा निवडक गोष्टींचें नंतर आम्हीं एक छापील पुस्तकहि काढलें होतें, चौवीस पानांचें, व तें संध्याकाळीं चौपाटीवर जाऊन एक आण्याला

१. 'गोष्ट' हें जुनें नांवच मला 'कथा', 'लघुकथा' या नांवांपेक्षा अधिक चांगलें वाटतें.

एक प्रत याप्रमाणें खपविण्याचा कांहीं दिवस उद्योगहि केला होता. 'वालमित्रा'चीं सर्व वांधीव पुस्तकें नंतर संपादक वावुरावांचे एक मित्र श्री० पानवलकर यांनीं वाचायला म्हणून नेलीं, तीं परत आलींच नाहींत. हें सर्व साहित्य अशा रीतीनें कारणीं लागलें.

नाटकें जीं लिहिलीं त्यांतील तीन अजून माझ्या संग्रहीं आहेत. 'सत्यमेव जयते', 'चांडाळचौकडी', आणि 'अरुण-प्रभा'. पहिलीं दोन छोटीं आहेत—स्वकपोलकल्पित. 'अरुण-प्रभा' हें राणा प्रताप आणि अकवर यांच्या संघर्षावर एका त्यावेळच्या कादंवरीवर आधारलेलें व थोडें मोठें आहे. कृष्ण-जीवनावरहि एक अर्धवट नाटक लिहिलें होतें असें आठवतें. एक संस्कृत नाटकहि लिहिण्याचा प्रयत्न केला होता. त्यांत सूत्रधार कवि पुरुषोत्तमाची ओळख करून देतांना 'काव्यार्थचोरः श्रुतपारदृश्वा...' या ओळीनें आरंभ होणारा एक श्लोक म्हणणार होता.

हा सर्व खटाटोप शालेय जीवनातला. कवितेला थोडी उशीरा सुरुवात झाली. मॅट्रिकच्या वर्गात असतांना कांहीं इंग्रजी कविताहि लिहिली. त्या सर्व वह्या मात्र आजतागायत जपून ठेवल्या आहेत.

गोष्टी लिहायला पुन्हां प्रारंभ इंग्लंडहून चोविसाव्या वर्षी परत आल्यावर थोडा केला. किर्लोस्करांत दोन गोष्टी छापूनहि आल्या. त्यांचीं नांवें : 'दोन भाऊ' आणि 'योगायोग', या त्यावेळींहि केवळ किर्लोस्करी सांच्याच्या नव्हत्या. पण मग कवितेकडेच जास्त वळलों. 'जोत्स्ना' मासिकांत एक पत्रात्मक कादंवरीवजा लिखाण सुरू केलें पण दोन हप्त्यानंतर तें पुढें रेंटलें नाहीं. 'डॉ० उद्धव शिराळी आणि त्याचें जग' असें त्यांचें शीर्षक होतें. त्यांत त्या काळच्या तरुण वर्गाची मनःस्थिति चित्रित करण्याचा मानस होता. अजूनहि तें पुरें करावें असें अधूनमधून वाटत असतें.

१९५० मध्यें मुंबईला कवि यशवंतांच्या अध्यक्षतेखालीं साहित्य संमेलन भरायचें होतें. त्यानिमित्तानें मुंबई मराठी साहित्य संघाच्या 'साहित्य' द्वैमासिकाचा खास अंक निघणार होता. संमेलन भरविण्यांत संघानेंच पुढाकार घेतला होता व मी स्वतः काव्यशाखा-संमेलनाचा कार्यवाह होतों. मर्ढेकर या संमेलनाचे अध्यक्ष होते. या प्रसंगाच्या निमित्तानें पुन्हां मी कथनात्मक लेखनाला प्रवृत्त झालों आणि एक लहानसेंच कथनात्मक स्फुट लिहून माझे मित्र आणि 'साहित्या'चे संपादक श्री० वा० रा० ढवळे यांना दिलें. या स्फुटाचें नांव होतें 'मनू' व लेखक म्हणून मी 'रूप कथ्थक' हें नांव दिलें होतें. साहित्यांत हें स्फुट आलेंच नाहीं, कारण श्री० ढवळे यांनीं तें हरवून टाकलें होतें. माझ्याकडे त्याची दुसरी प्रतहि नव्हती. (त्या वेळेपासून मी नेहमीं माझ्या लिखाणाची एक जादा प्रत काढून ठेवूं लागलों.) 'मनू' मी पुन्हां लिहायला घेतली; पण ती मोठी करण्याचा माझा आधीं विचार नव्हता. किंबहुना ती एवढी मोठी होईल अशी माझी त्या वेळीं कल्पनाहि नव्हती. पहिला भाग जेव्हां 'सत्यकथे'त छापून आला तेव्हां मला आणखी पुढें लिहावें असें वाटलें. पुढील अंकांत दुसरा भाग लिहून दिला, मग तिसरा. तीनचार वर्षें ही गोष्ट मीच लिहिली याची पुष्कळांना कल्पना नव्हती. लोणावळ्याच्या आमच्या १९५५ मधील साहित्यिक मेळाव्याहून परत येतांना मी ती गाडींत वाचून दाखविली तेव्हां हा गौप्यस्फोट झाला.

'मनू' ही वरीचशी आत्मचरित्रात्मक गोष्ट आहे. तिच्या स्फूर्तिदात्रीपासूनच मी 'कथ्थक' हें नांव घेतलें. 'रूप' हें माझ्या 'पुरुषोत्तम' या नांवांतील पहिल्या दोन अक्षरांची थोडी उलटा-पालट करून आधीं जोडलें. 'मनू'चें इंग्रजी भाषांतर नंतर टाइम्स

ऑफ इंडियाच्या अन्युअलमध्यें आलें. तिकडून तें साहित्य अका-दमीनें प्रसिद्ध केलेल्या 'इंडियन शॉर्ट स्टोरीज' या पुस्तकांत गेलें व आजतागायत तिचें, माझ्या माहितीप्रमाणें, गुजराती, फ्रेंच, जर्मन, स्वीडिश, स्पॅनिश, रशियन व चिनी या भाषांत भाषांतर झालें आहे. हिंदी भाषांतर, 'सावित्री' व 'अवलोकिता' यांच्या समवेत 'तीन सहेलियाँ' या भारतीय ज्ञानपीठातर्फे लवकरच प्रसिद्ध होत असलेल्या पुस्तकांत येत आहे.

१९५४ मध्यें जेव्हां आम्ही 'छंद' सुरू केला तेव्हां पहिल्याच अंकासाठीं 'गोष्ट' लिहिली. नंतर पुढील प्रत्येक अंकांत एक एक 'गोष्ट' देत गेलों. त्याच 'सुप्रिया', 'विन्दो', इत्यादि. 'छंद'च्या पहिल्या वर्षानंतर हें लेखन तितकें नियमित होऊं शकलें नाहीं. 'छंद' १९६० मध्यें बंद झाल्यानंतर ज्या चार गोष्टी लिहिल्या त्या 'दीपावली'च्या दिवाळी अंकांत वेळोवेळीं प्रसिद्ध झाल्या. त्या या दुसऱ्या आवृत्तीच्या शेवटीं दिल्या आहेत. अलिकडे पांचसहा वर्षें 'गोष्ट' अशी लिहिली नाहीं.

माझें 'रूप कथ्थक' १९५६ मध्यें प्रसिद्ध झालें. त्यांत या आवृत्तींतील शेवटच्या पांच गोष्टी (ज्या नंतर लिहिल्या गेल्या) वगळून सर्व आल्या होत्या. परंतु या पुस्तकाचें नीट परीक्षण असें अजूनपर्यंत कोणी केलेंच नाहीं. आपली मराठी टीका ही अशी आहे.

आज जेव्हां या सर्व गोष्टींकडे मी थोड्या तिऱ्हाइतपणानें पाहतों तेव्हां त्यांचे कांहीं विशेष मला अधिक स्पष्टपणें जाणवूं लागतात. यांतील कथक एक मुक्त, पुष्कळसा भिडस्त (वाटल्यास भीरूहि म्हणा), दुसऱ्याच्या मनाची, भावनांची अधिक कदर करणारा असा पुरुष आहे. तो एखादीच्या अगदीं जवळ येतो, पण नंतर योगायोगानें किंवा स्वतःच्या शिस्तीनें तसाच दूर जातो, गेला असें

वाटूं लागतें. 'विपर्ययः स्त्रीपूर्वकः' या गोष्टींत नाहीं म्हणायला प्रत्यक्ष स्त्रीसंबंध घडून आलेला दिसतो. (पण येथें कथक दुसऱ्याची गोष्ट सांगत आहे.) 'अनुराधा' नवऱ्याला सोडून त्याच्याजवळ 'राहिली' असेंहि कदाचित् अनुमान काढतां येतें. पण अन्यत्र सगळीकडे तो स्वतःच लादून घेतलेल्या एका मर्यादेंत वावरतो. त्याला भेटलेल्या स्त्रिया (प्रत्येक गोष्टींतील कथक तोच समजला तर) वेगवेगळ्या वृत्तीच्या, वेगवेगळ्या भौगोलिक परिसरांतील आहेत. त्या स्वतः कांहीं तरी एक विसरू पहात आहेत, असें सारखें वाटत असतें. कथकाशीं त्यांचे संबंध चुटपुटते पण तितकेच अतूट, दोघांनाहि कधींच न विसरतां येण्यासारखे असतात. प्रत्यक्ष शरीरसंबंध न घडतांहि तीं दोघें संबंधित झालेलीं असतात. दूर जाऊनहि—राहूनहि—तीं एकमेकांना सतत कांहीं तरी देत असतात. यामुळें या सर्वच गोष्टींत एका प्रकारची दुखऱ्या आनंदाची (tragic ecstasy) छाया सतत झिरपत असलेली दिसून येते.

या संग्रहांतील आरंभींची 'गोष्ट' आणि शेवटाकडील 'साक्ष' यांना कदाचित् गोष्ट म्हणणें पुष्कळांना जड जाईल. माझा स्वतःचा तसा या नांवाबद्दल फारसा आग्रहहि नाहीं. या दोहोंत प्रतीकात्मक पद्धतीनें या संग्रहांतील बहुतेक गोष्टींचें बीज दिसून येतें असें मात्र मला खास वाटतें.

या सर्वच गोष्टींत एक जिवंत ओघ आहे. सांगणारा दोन-चार फटकाऱ्यांत एखादें चित्र किंवा प्रसंग उभा करतो व झटकन पुढें जातो. त्यांच्यावर रेंगाळायचें आहे तें वाचकानें. तो त्यासाठीं थांबत नाहीं. लवकरांत लवकर त्याला मोकळें व्हायचें असतें. कदाचित तो स्वतःच थांबला तर उगाच विवश होऊन जाईल अशी त्यालाच भीति वाटत असावी. कदाचित् त्याला जें जाणवलें आहे तें या

सगळ्याच्या पलीकडचें आहे असेंहि असेल. त्यामुळें यांतील कोणतीच गोष्ट जिथें थांबते तिथें संपत नाहीं.

या सर्वच कारणांमुळें मला स्वतःला या गोष्टी अतिशय आवडल्या आहेत. इतर पुष्कळांनाहि आवडल्या आहेत. माझ्या स्वतःच्या वृत्तीचें एक मनोरम रूप मला त्यांच्यांत नेहमींच—आणि वेगवेगळ्या तऱ्हांनीं—दिसून आलें आहे.

'रूप कथ्थक'ची आवृत्ति तीन-चार वर्षांपूर्वींच संपली. आतां 'मनवा' या नवीन नांवानें त्यांतील सर्व गोष्टी आणि नंतरच्या गोष्टी आज पुन्हां, माझें लौकिक नांव लावून, वाचकांच्या हातीं देत आहें.

रामनवमी, १८९०

पु० शि० रेगे

# म नू

मनूला (तिचं खरं नांव मनुवेला—Manuela—असं होतं.) मीं नक्की पहिल्यांदा कुठं पाहिलं हें आठवूनहि मला कधींच आठवलं नाहीं. नाहीं म्हणायला तिच्याविषयीं विचार करायला लागलों कीं लंडनमधील ती दाट काळ्या-पिवळ्या धुक्याची सायंकाळ आणि टॉटनहॅम कोर्ट रस्त्यावरील वर्दळ माझ्या पुन्हां पुन्हां दृष्टीसमोर येते. कदाचित् तिथंच कुठं तरी नव्हेंबर-डिसेंबरच्या सुमाराला बसची वाट पहात असतांना मीं तिला प्रथम पाहिलं असावं. पण मग वसंतांतहि सकाळच्या वेळेला हॅम्पस्टेड हीथवरील तळ्यांतील हंसांना ब्रेडचे तुकडे टाकतांना मीं तिला पाहिल्याचं आठवतं; आणि स्टोल सिनेमापाशीं एका हातांत पुस्तक आणि एका हातांत सँडविचचा तुकडा घेऊन खात उभी असलेली मीं तिला पाहिली होती हेंहि आठवतं. तिचीं अशीं किती तरी दर्शनं आठवतात; आणि मग मी ऐतिहासिक सत्य हुडकून काढण्याचा हा नादच सोडून देतों.

ती कधीं आणि कुठं दिसेल याचा नेम नव्हता. आणि त्यामुळंच ती दिसली कीं त्यांत कांहीं अनपेक्षित, जगावेगळं आहे असं मला वाटत नसे. प्रत्येक वेळीं तिचा कांहीं तरी निराळाच चाळा असे. कधीं ती इतक्या साळसूदपणानं आपल्या भोंवतालच्या व्यापाकडे पाहायची कीं तिच्यांत कुणी तरी जगाच्या आदिअंताचा विचार करणारा तत्त्वज्ञच संचरला आहे असं पहाणाराला वाटावं.

कधीं ती तितक्याच अल्लडपणानं भोंवतालच्या जीवनाशीं समरस व्हायची. पण केव्हांहि तिच्या मनाचा कधींच ठाव लागूं नये; आणि हें तिच्या वागणुकींत इतक्या सहज—स्वाभाविकपणानं—व्हावं कीं कुठंहि तक्रारीला, स्पष्टीकरणाला जागाच उरूं नये. मात्र या निरनिराळ्या प्रसंगींहि तिच्यांत एक कांहीं तरी विशेष आहे, आणि तें काय हें जरी सांगतां आलं नाहीं तरी तें केवळ आपल्यालाच गवसलं आहे असं मला राहून राहून वाटे. ती दिसली कीं क्षणभर सारं कांहीं विसरून जावं. असंहि वाटावं कीं आतां ती कांहीं पुन्हां दिसणार नाहीं. आणि तरीसुद्धां तिच्याशीं अनंतकाळच्या लागेबांध्यांनीं निगडित व्हावं-होऊं नये—असं दोन्हीहि मला एकदम वाटायचं. हें असं कां होई याचा उलगडा करतां येणार नाहीं असं नाहीं. एखादी गोष्ट खूपशी हवी असावी, पण तिची प्राप्ति होणार नाहीं या भीतीनं ती मिळावी आणि मिळूंहि नये अशी मनाची द्विधा अवस्था होणं कांहीं अगदींच अस्वाभाविक नाहीं. पण मनूचा मीं इतक्या तटस्थ वृत्तीनं कधींच विचार केला नाहीं. आजहि तो तसा मला करतां येईल किंवा काय याविषयीं मी साशंक आहें.

पहिल्या त्या दिवसांत ती जेव्हां जेव्हां मला दिसे तेव्हां तेव्हां ती मलाच बोलावते आहे असं वाटे. आपण होऊन तिच्याजवळ जावं, कांहीं तरी निमित्त काढून बोलावं, असं मला प्रत्येक वेळीं वाटे. पण ती पुन्हां दिसणार नाहीं या विचारानंच मी इतका बावरून जाई कीं मला कांहींच करण्याचं त्राण उरत नसे. मला उगीचच वाटे कीं तिला हें सारं माझ्या मनांतलं काहूर कळत असावं. तिच्या पहाण्याचा, हंसण्याचा, हालचालीचा मी माझ्या मतें सोईस्कर अर्थ लावीत असें. माझं निदान कांहीं अगदींच

अनाठायीं नव्हतं असं जरी मला नंतर कळून आलं तरी त्यावेळीं मला त्याची कल्पना नव्हती.

ती दृष्टीआड झाली कीं आतां ती पुन्हा दिसणार नाहींच, अशीच माझ्या मनाची भावना व्हायची. मन घट्ट करून मी तिला विसरून जाई—विसरून जाण्याचा प्रयत्न करीं आणि मग ती पुन्हा अगदीं अनपेक्षितपणं कुठं तरी दिसायची आणि हें चक्र पुन्हां सुरू व्हायचं. त्या पहिल्या तीनचार महिन्यांत मीं तिला आठदहा वेळांच पाहिलं असेल; पण वाटायचं असं कीं तिला खूप वेळ पाहिलं आहे.

असंच एकदां मीं तिला बसची वाट पहात असतांना संध्या-काळच्या सहाच्या सुमारास पाहिलं. मी त्या वेळीं कॉलेजच्या लायब्ररींतून घरीं परत चाललों होतों. तिला पहातांच अंमळ थबकलों. आणि मग तिनंच मला जवळ बोलावलं आणि आपल्या हातांतील दोन पुस्तकं माझ्या हातांत देत, "ही आत्तांच आलें" असं सांगून ती क्षणांत बाजूच्या गल्लींत दिसेनाशी झाली. कां कोण जाणे, या वेळीं ती पुन्हा येणार, आपल्याशीं बोलणार, तिच्याशीं आपली खरोखरच ओळख होणार, असं मला वाटलं. केवळ तिच्या पुस्तकांची निशाणी माझ्या हातांत होती म्हणून असं वाटलं असं कांहीं नाहीं म्हणतां येणार. एव्हांना मी आजूबाजूचं सारं कांहीं विसरून गेलों होतों. कांहीं तरी मनांत विचार येऊन, तिचं नांवगांव कळेल या अंधुक कल्पनेनं मीं पहिल्याच पुस्तकाचं कव्हर उघडलं :

*Manuela Hartmann, Wien*

मनुवेला हार्टमन, व्हीन. म्हणजे ही ऑस्ट्रियन, व्हिएन्नाची. मनुवेला, मनुवेला. मीं लगेच तिच्या नांवाचं मनू असं हिंदीकरण करून टाकलं. इतक्यांत ती आली. तिच्या हातांत एक पिशवी

होती. “मीं कांहीं सँडविच आणले आहेत. आपण हीथवर फिरायला जाऊं.” मला कांहींच बोलायला अवसर न देतां माझा हात हातांत घेऊन ती चालायला लागली. मनू...मनू...मनू... मी मनांतल्या मनांत जपत होतों. बसपेक्षां अंडरग्राउंड रेल्वे हीथवर जाण्यासाठीं अधिक सोयीची होती हें मला नंतर कळलं.

त्यानंतर आम्ही वरचेवर भेटूं लागलों. कुठं आणि कधीं भेटायचं हें सारं तीच ठरवीत असे आणि एकदां ठरलं कीं अगदीं न चुकतां ती त्या वेळीं येत असे. या भेटींत बोलण्याचं काम तिचं. मीं निमूटपणें ती सांगेल तें ऐकत बसायचं. बोलतांना ती उच्चार असे कांहीं गोड आणि चमत्कारिक करायची कीं इंग्रजी भाषेंतील सर्व रूढ उच्चार रद्द करून तिचेच उच्चार चालू करावे असं वाटायचं. मध्येंच टाळी पिटून, डोळे मिचकावीत “या, या” (Ja, Ja=होय, होय) असं ती म्हणायची, आणि हातांचे पंजे दोन्ही मांड्यांवर घेऊन हंसूं लागायची. ती असं बोलूं लागली कीं मला आपल्या इकडील दक्षिण कानड्यांतील स्त्रियांच्या बोलण्याची आठवण व्हायची. त्याहि अशाच लाघवी, साध्या वाक्यांतहि गोडवा घोळवणाऱ्या.

मनूला बोलायला असा विषयच लागत नसे. प्रत्येक गोष्टीवर तिचं एक कांहीं निराळं मत असायचं. आकाश हा एक मोठा थोरला निळा समुद्र आहे असं तिचं मत होतं. माझा काळा रंग तिला विशेष आवडायचा. युरोपांतील लोकांचे पूर्वज हे पूर्वी हिंदुस्थानांतच होते व तिकडून ते पांगले व युरोपांत आले अशीहि तिची एक थिअरी होती. जिथं नैसर्गिक समृद्धता अधिक आहे तिथं मानवी अस्तित्व आधीं असणं स्वाभाविक आहे असं ती आपल्या या मताचं समर्थन करायची. माझे पंजे आपल्या

मानेखालच्या भागावर दाबून आणि या दीर्घ काळांत त्यामुळं ही
वर्णविसंगति किती वाढली हें प्रत्यक्ष दाखवीत ती मग या चर्चेची
परिसमाप्ति करायची. ती असं कांहीं बोलूं लागली कीं तिच्याशीं
वाद घालायची सोयच नव्हती. जरा कांहीं उलट बोललं, तिच्या
म्हणण्याविषयीं थोडीसुद्धां नापसंती दाखविली कीं एकदम ती तो
विषयच सोडून द्यायची. त्यापेक्षां सर्वथैव तिच्या कलानं घेऊन
तिच्या बोलण्याच्या ओघांत सारं कांहीं विसरून जाणं अधिक
श्रेयस्कर होतं. असा संयम दाखविला कीं त्याचं तसंच कांहीं तरी
बक्षीस मिळायचं—अगदीं प्रत्येक वेळीं नवीन आणि अनपेक्षित !

आमच्या या अशा गांठीभेटी होत, तरी मनू नक्की काय
करीत असे तें मला कळलं नव्हतं. तिला तसं प्रत्यक्ष विचारायचीहि
सोय नव्हती. एकदां ती सहज म्हणून गेली कीं मी चित्रं काढतें व
चित्रकलेच्या अभ्यासासाठीं इंग्लंडला आलें आहें. मला वाटायचं
कीं ज्याला खरोखरच चित्रकलेचा अभ्यास करायचा आहे तो पॅरिस
किंवा इटलींतील अनेक शहरांत मुद्दाम जाईल. इंग्लंडला कांहीं
चित्रकला इतकी उतूं आलेली नाहीं. ती उगाच कांहीं तरी म्हणाली
असं मी सांगतलं नाहीं. प्रत्यक्षांतलं जीवन आणि कल्पनेंतलं जीवन
यांच्यांत ती इतकी सहज गल्लत करीत असे कीं तिचं कोणतंहि
विधान लौकिक अर्थानं पडताळून पाहायची सोयहि नव्हती आणि
तशी इच्छाहि उरत नसे.

कदाचित् ती मॉडेल म्हणून काम करीत असावी असाहि विचार
माझ्या मनांत येऊन गेला आणि मग मला उगीचच भीति वाटूं
लागली. कथा-कादंबऱ्यांतून मीं चित्रकारांच्या मॉडेलविषयीं बऱ्या-
वाईट गोष्टी वाचल्या होत्या. तसं पाहिलं तर मॉडेलचं काम करायला
ती अगदीं योग्य होती. तिच्या चेहऱ्यावरील भाव जितक्या

सहजपणें बदलत तितक्याच सहजपणें कोणताहि भाव तासन्तास ती स्थिर ठेवूं शके. बोलतांना मध्येंच ती आपला खालचा ओठ थोडा उजवीकडे लोटीत आपले डोळे अधिक मोठे करायची—आणि किती तरी वेळ तशीच राहायची. एकदां तर बराच वेळ श्वासहि रोखून ती इतकी स्तब्ध राहिली होती कीं मी खरोखरच घाबरून गेलों. इतकं आदर्श मॉडेल कुणाला नको झालं असतं ?

या गोष्टीला सातआठ दिवस होऊन गेले. त्यानंतर जेव्हां ती मला भेटली तेव्हां तिच्या हातांत एक कागदाची पिशवी होती. त्या पिशवींतून एक चित्र काढून तिनं तें माझ्या हातांत दिलं. चित्र साधं लाइन अँड वॉशचं, जपानी चित्रकलेच्या धर्तीवर होतं· एक पांढराशुभ्र मोर पिसारा उभारून, उजवा पाय वर उचलून नाचतो आहे, असं त्याचं शुष्क वर्णन करतां येईल. वास्तविक चित्र इतकं सुंदर होतं कीं तो मोर उचललेला पाय खालीं करून दुसरा वर घेऊन खरोखरच नाचणार असं वाटावं. मी कांहीं काळ त्या चित्राकडे पहात राहिलों आणि मग जें करूं नये तें—मनूच्या बाबतींत कधींहि करायला नको होतं तें—केलं. “खरोखरच का हें चित्र तूं काढलंस ?” असं मीं तिला विचारलं. तिनं अगदीं संथपणं तें चित्र माझ्या हातांतून घेतलं आणि त्याचे फाडून तुकडे केले. तिच्या चेहऱ्यावर त्या वेळीं कसलाच भाव नव्हता. ती त्यावेळीं रागावली असती, मला नाहीं नाहीं तें टाकून बोलली असती, तरी तें मला परवडलं असतं. पण तिनं तसं कांहींच केलं नाहीं.

त्यानंतर ती मला पुन्हा दिसली नाहीं.

वास्तविक पहातां जर गोष्टच लिहायची होती तर ती इथंच संपायला हवी होती. पण खऱ्या आयुष्यांतील गोष्टी अशा संपत

नसतात. एकींतून दुसरी उद्‌भवते—अगदीं कळकीच्या बेटांतील कोंभासारखी—आणि मग खरी गोष्ट सुरू कुठं झाली आणि संपली कुठं हेंच कळेनासं होतं. मनू एकदां हीथवर गवतावर पडल्या-पडल्या मला म्हणाली होती कीं, सर्वच गोष्टी एकाच वेळीं चाल-लेल्या असतात. माझ्यासारख्या तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थ्यालासुद्धां या तिच्या म्हणण्याचा एकदम अर्थबोध झाला नाहीं. तिच्याच शब्दांत जर या गहन वाक्याचा अर्थ सांगायचा तर असा सांगतां येईल : "मी बोलतें आणि हवेंत लहरी उठतात. त्या कुठं जातात? इथं तिथं. कांहीं अडकतात, कांहीं अडखळतात. पण एक तरी नाहींशी होते काय? नाहीं. तो सृष्टीचा धर्म नाहीं. सृष्टि सगळं राखून ठेवते. मग त्या सगळ्या एकाच वेळीं तरळत असतात. जो ऐकेल त्याला ऐकूं येतात." बोलतां बोलतां ती इतकी गंभीर झाली कीं जणुं विश्वांतील साऱ्या नादलहरींचाच ही वेध घेत आहे. तिच्या समाधीचा भंग होणार नाहीं या थाटांत मीहि मग तिला हळूच विचारलं, "तुला या वेळीं काय ऐकू येतं?" ती लगेच म्हणाली, "तूं चौदा वर्षांचा असतांना एका दर्या-किनाऱ्यावरच्या वाळूंत वाट चुकलास. तुझ्या अपेक्षेपेक्षां आधीं त्या दिवशीं संध्याकाळ संपून अंधार पडला, आणि घाबरून तूं मला हांक मारूं लागलास. त्या हांका मी ऐकतें आहें." मी एकदम दचकलों. कारण असाच कांहींसा प्रसंग सहा वर्षांपूर्वी मी कुंदापूरला आजोळीं गेलों असतांना घडला होता व त्या दिवशीं मला घरीं यायला उशीर झाल्यामुळं बोलून घ्यावं लागलं होतं. तपशिलांत फरक इतकाच कीं त्या वेळीं मी चौदा वर्षांचा होतों, आणि माझ्याबरोबर आमच्या शेजारची निर्मल—निमा—होती. हांका मात्र मीं कोणाला मारल्या नाहींत. निमाचा आणि तिच्यापेक्षां अधिक तिच्या वडिलांचा मी त्या वेळीं

धडधडत्या हृदयानं विचार करीत होतों. मला साम्य जाणवलं तें 'मनुवेला' आणि 'निर्मला' या दोन नांवांतल्या वर्णांचं.

या घटनेंतून मला जर कांहीं पटलं असेल तर तें हें कीं, जीवनांतील व्यक्ती आणि प्रसंग मोजकेच असतात. त्यांत नावीन्य आपण स्वतः आणायचं असतं. त्याच लहरींतून नवीननवीन सूर काढायचे असतात. मनूला हें अगदीं सहज साध्य होत असे. कोणताहि प्रसंग तिला अनपेक्षित वाटत नसे. साऱ्यांचा ती सहज स्वीकार करी. इंग्रजींत all in a day's work म्हणतात त्याप्रमाणं. तिच्या या वृत्तीमुळं तिला केव्हांच अवघडल्यासारखं वाटत नसे. अवघडल्यासारखं वाटणं म्हणजे जें कांहीं आहे—जें सत्य म्हणून पुढं उभं आहे—त्याच्या स्वीकाराला हरकत घेणं. तें तिला पसंत नव्हतं; तिला तें जमलंहि नसतं.

एखादे वेळीं माझ्या मनांत असा विचार येतो कीं, आपण मनूच्या वागण्याचा जो हा असा अर्थ लावतों तो योग्य आहे का? निदान तो तिचा तरी तिला असा कळला होता का? वास्तविक पहातां हे दोन्ही प्रश्न अगदींच गौण आहेत. ज्ञान हें नेहमीं मागाहून होत असतं. त्यासाठीं साकल्यानं साऱ्या गोष्टींचा विचार करावा लागतो. रोजचं जीवन कांहीं त्यासाठीं थांबत नाहीं. मनूनं हें हेरलं होतं...

चुआंग त्सु आणि हुइ त्सु एके दिवशीं फिरत फिरत हाओ नदीच्या पुलावर आले. चुआंग त्सु म्हणाला, "पहा, हे लहानगे मासे कसे इकडून तिकडे मन मानेल तसे उड्या मारीत आहेत. खरंच, त्यांना किती मजा वाटत असेल?" हुइ त्सु म्हणाला, "तूं कांहीं मासा नाहींस. मग माशांना कशांत मजा वाटते हें तुला कसं समजणार?" चुआंग त्सु म्हणाला, "तूं कांहीं मी नाहींस.

मग माशांना मजा वाटते हें मला समजणार नाहीं असं तूं तरी कशाच्या आधारावर म्हणतोस?" हुई त्सु म्हणाला, "मी तूं नाहीं, म्हणून जर तुला समजतं कीं नाहीं हें मी समजूं शकणार नाहीं, तर त्याच न्यायानं माशांना कशांत मजा वाटते हें तुलाहि समजूं शकणार नाहीं. माझंच म्हणणं शेवटीं खरं ठरतं." चुआंग त्सु म्हणाला, "आपण पुन्हां पहिल्यापासून सुरुवात करूं या. तूं मला विचारलंस कीं माशांना कशांत मजा वाटते हें मला कसं समजलं. पण जेव्हां मला हा तूं प्रश्न केलास तेव्हांच तुलाहि तें कां तें समजलं होतं. हाओ नदीच्या पुलावर असं उभं असतांनाच तुलाहि तें समजलं होतं." रोजचं ज्ञान हें या प्रकारचं असतं. तें वादानं साध्य होत नसतं.

आणि म्हणूनच मनू सहसा आपण होऊन प्रश्न विचारीत नसे. विचारलाच तर तो स्वगत असे, व त्यावर तिचं उत्तरहि लगेच येत असे. प्रश्न म्हणजे अनिश्चितपणा आणि नेमकं त्याचंच तिला वावडं असे. पण एकदां मात्र तिनं मला—आणि तोहि माझ्यासंबंधींच—प्रश्न विचारला. "तूं कोण होणार आहेस?" तिनं मला विचारलं. मीं अगदीं साधेपणानं सांगितलं, "म्हैसूरला परत गेल्यावर मी महाराजा कॉलेजमध्यें प्रोफेसर होणार आहें. त्यासाठींच तर मला आमच्या सरकारनं इथं शिष्यवृत्ति देऊन पाठवलं आहे. तत्त्वज्ञानावर मला खूप लिहायचं आहे." बराच वेळ ती कांहींच बोलली नाहीं. मला वाटलं, कदाचित् माझ्या उत्तरांतील भावी वियोगाच्या सूचनेमुळें ती विषण्ण झाली असावी. थोड्या वेळानं "तुला रूप व्हावंसं नाहीं वाटत?" एवढंच म्हणूनच ती उठली आणि जाण्याच्या तयारीला लागली.

तिच्या बोलण्याचा खरा रोख मला नंतर कित्येक दिवसांनीं कळला. होणं म्हणजे काय, तर आहे त्याला वाव देणं. त्यासाठीं

श्रम लागत नाहींत, पण निवड मात्र अवश्य लागते. आवडती गोष्ट करतांना श्रमाची भावनाच होत नाहीं. सारं कांहीं सहज होतं. सर्व वृत्ती कशा एकोप्यानं काम करतात. गाडीचीं पांच मिनिटंहि वाट पहाणं दुःसह होतं, पण प्रिय व्यक्तीची कितीहि वाट पाहून जीव कावला तरी श्रमाची जाणीव होत नाहीं.

ठरल्यापेक्षां होब्नर्नं स्टेशनवर यायला मला असाच एकदां चांगला अर्धा तास उशीर झाला. मी मनांतून खूप घाबरून गेलों होतों. पण मनूचं तें नेहमींचं दर्शन होतांच साऱ्या वृत्ती कशा अगदीं थोपटल्यासारख्या स्थिर झाल्या. "मला उशीर झाला." मीं म्हटलं. ती म्हणाली, "छे, तूं तर इथंच होतास. कांहीं वेळ तूं तो पलिकडचा खांब होईस आणि दुसऱ्या खांबाबरोबर लपंडाव खेळूं लागस. कांहीं वेळां हें माझ्या शेजारचं तिकिट मशीन होऊन मला फसवूं पहात असस. मघांशीं तर एक लहानगं वछडं होऊन तूं माझ्या पायालाच बिलगलास." ती हें इतकं सहज म्हणाली कीं, आम्ही दोघंहि हसूं लागलों.

प्रत्येक गोष्टींत तिची वागणूक इतकी साधी, निष्कपट असे. पण त्यामुळंच तिच्याशीं कसं वागावं हें कधीं कधीं कळत नसे. आपला जगाचा अनुभव जसा वाढतो तसा आपल्या वागण्यांत अधिकाधिक साचेबंदपणा येतो. सारी धडपड जणुं कांहीं हीं वागणुकीचीं कोष्टकं मांडण्यासाठीं आणि नंतर त्यांचा ताळा पहाण्यासाठीं चाललेली असते. समाज त्याशिवाय चालणार नाहीं अशी आपण समजत करून घेतों. शिवाय हेंहि खरें कीं प्रत्येक गोष्ट जर प्रत्येक वेळीं नव्यानें ठरवायची तर कुणालाहि वेड लागायची पाळी येईल. पण मनूकडे पाहिलं कीं वाटायचं कीं हें सगळं फुकट आहे. खरं पाहिलं तर आपल्या मनासारखं वागायचं असलं कीं त्यासाठीं

सबब शोधायची जरूरी नसते. दुसऱ्याच्या तंत्रानं किंवा कलानं वागायचं म्हणजेच मग स्वतःच्या मनाला समजावण्यासाठीं सबबी शोधाव्या लागतात; आणि एकदां ही संवय जडली कीं, कोणती गोष्ट कोणत्या रूढ नियमांत फिट्ट बसते हें आपण आधीं पाहूं लागतों. ती आपल्याला हवी आहे कीं नाहीं हा विचारच आपण जवळजवळ विसरून जातों.

एकदां मनू, आम्ही आयर्लंडला गेलों असतांना, कोणताहि संकोच मनांत न आणतां, बोलतां बोलतां सहज उठून, आपले सारे कपडे काढून, लॉक ॲलनच्या पाण्यांत उतरली. मला कांहीं पोहतां येत नव्हतं, पण तिच्या या कृतीनं मी कांहीं काळ स्तिमितच झालों. कुणीं पाहिलं तर काय होईल, हीच मला सारखी भीति वाटत होती. ती पाण्यांत किती सुंदर दिसत होती आणि बाहेर आल्यावर मुळींच घाई न करतां कांहीं वेळ जेव्हां आंग्रेच्या ला सूर्ससारखी निश्चल उभी राहिली तेव्हां कशी अधिकच सुंदर दिसली—हें सारं मला त्या वेळीं केवळ स्वप्नासारखं वाटलं...आणि म्हणूनच जें सत्य जवळ होतं त्याचा स्वीकार करायला मी कचरलों. मनू जर तशीच ओल्यानं धावत येऊन माझ्या अंगावर पडली नसती तर मला हें सत्य कधींच गवसलं नसतं...

एक पापभीरु ब्राह्मण होता. त्याला एकदां अकस्मात् देव प्रसन्न झाला. देवानं त्याला विचारलं, "बोल, तुला काय देऊं?" या अकल्पित लाभानं तो ब्राह्मण इतका गांगरून गेला कीं त्यानं देवाला सांगितलं, "हे प्रभो, मला काहींच सुचत नाहीं. मी विचार करून उद्यां सांगेन. मला माझ्या गृहिणीला विचारलं पाहिजे. गुरुजनांचं मत घेतलं पाहिजे." देव म्हणाला, "ठीक आहे." दुसऱ्या दिवशीं देवाची वाट पाहून पाहून तो ब्राह्मण थकून गेला. एकदां

प्रसन्न झालेला देव कांहीं पुन्हा आला नाहीं. नीवीविमोक्षाच्या वेळीं वस्त्रमूल्याचं विचिंतन करणारा अरसिकहि बहुधा याच जातीचा असावा.

मनूच्या बोलण्यांत मागचा किंवा पुढचा अगदीं क्वचितच उल्लेख असे. जणुं कांहीं प्रत्येक क्षण अगदीं वेगळाच आहे, आणि तो तसा अनुभवायला पाहिजे, याची तिला पुरेपूर जाणीव होती. यामुळंच तिचं दर्शन नेहमीं प्रसन्न, बोलणंचालणं अनपेक्षित—आणि म्हणूनच कीं काय, त्या प्रसंगीं सर्वथैव उचित—असं असे. त्या मोराच्या चित्राच्या प्रकरणानंतर ती मला पुन्हा कां भेटली नाहीं याचा जेव्हां मी विचार करतों तेव्हां एका दृष्टीनं तिचं वागणं तिच्या नेहमींच्या वृत्तीला धरून नव्हतं असं वाटतं. माझ्या प्रश्नानं तिचा अहंकार दुखावला. तिचा माझ्यावरचा विश्वास उडाला. आपल्या मनाशीं तिनं जें एक स्वप्नविश्व उभारलं होतं त्याला धक्का बसला. हीं सहज सुचणारीं स्पष्टीकरणं मग मलाहि सुचतात. पण जरा अधिक विचार केला कीं तिच्या त्या वेळच्या वागणुकीचा कांहीं निराळाच अर्थ लागतो. तिच्या दृष्टीनं चित्र कुणीं काढलं हा महत्त्वाचा भाग नव्हता. तें कसं आहे, तें काय सांगतं, हा अधिक महत्त्वाचा भाग होता. त्यानंतर ती मला पुन्हा दिसली नाहीं त्याचा आणि या घटनेचा वास्तविक कांहीं संबंध नसावा—नव्हे, नव्हताच—असं मला वाटतं.

१८ | मनू

मनूच्या अकल्पित नाहींसं होण्यानं मी कांहीं दिवस अगदींच शून्यवत् होऊन गेलों. मला कांहींच सुचेनासं झालं. सुदैवानं माझी परीक्षा त्याच वेळीं जवळ आली होती. अभ्यासाकडे सारं लक्ष लावून, झालं गेल सारं विसरून जावं, असा मीं पोक्त विचार केला.

तो बऱ्याच अंशीं अंमलांतहि आणूं शकलों. एकीकडून वाटे, तिचा शोध करणं हें आपलं कर्तव्य आहे. इतक्या निकटच्या सहजीवनानंतर जणुं कांहींच झालं नाहीं असं समजून प्राप्त परिस्थितीला शरण जाणं मला कृतघ्नपणाचं वाटे. तिच्या जिवाचं कांहीं बरंवाईट तर झालं नसेल ना, असाहि विचार मनांत चमकून जाई. दुसरीकडून वाटे कीं, आतां पुन्हां नशिबाचे खेळ पहाणं नको. माझा अहंभावहि याच विचाराला साथ देई. आपण असं काय केलं होतं कीं तिनं असे एकाएकीं सारे संबंध तोडून टाकावे? तिच्या लहरींच्या तालावर आपणच नेहमीं काय म्हणून वागावं? एका विचारांत प्रीतीच्या विशाल भूमिकेची साक्ष होती; दुसरींत प्रीतीचा स्वार्थ डोकावत होता.

मला वाटतं, जोंपर्यंत सर्व कांहीं नीट सुरळीत चाललेलं असतं तोंपर्यंत विचार करण्याची आवश्यकता भासत नाहीं; विचार सुचतहि नाहीं. गाडं अडलं म्हणजेच मग तत्त्वज्ञान सुचतं. मनूचं मला कौतुक वाटायचं तें अशासाठीं कीं तिला अशा प्रकारच्या विचाराची किंवा तत्त्वज्ञानाची कधींच आवश्यकता भासली नाहीं. एका अर्थानं तिचं जीवन पूर्णतः जीवधर्माच्या पातळीवर (biological plane वर) होतं. जीवधर्माचं रहस्य ध्वनीला प्रतिध्वनि देण्यांत, सवालाला जबाब देण्यांत असतं. त्यांत आपपरभावाला जागा नसते. शिकार आणि शिकारी, गुरु आणि शिष्य, प्रियकर आणि प्रेयसी, मारणारा आणि मरणारा यांचं ऐक्य त्यांत आपोआपच सिद्ध झालेलं असतं. हें झालं जीव-धर्माचं तात्त्विक रहस्य. याहून अधिक त्याविषयीं कांहीं सांगतां येईल असं मला वाटत नाहीं. ज्याचं वागणं कुठंच विसंगत वाटत नाहीं—अगदीं पहिल्याच झटक्याला जें यथायोग्य आहे असं वाटतं, त्यालाच हें रहस्य

कळलं आहे असं म्हणतां येईल. विचार आणि कृति असा भेद करायला त्याच्या वागणुकींत अवसरच सांपडत नाहीं. मनू जेव्हां तासन्‌तास गवतावर निश्चल पडून राही, किंवा मुलांच्या घोळक्यांत स्वतःला विसरून त्यांच्यांतलंच एक मूल होई, किंवा आपल्या फुगीर बोटांच्या कैचींत माझे केस पकडून एकाच वेळीं हंसत आणि रडत खालीं वाकून माझा जीव घेई—तेव्हां मी हें तिचं रहस्य थोडंसं जाणूं शके. प्रत्येक क्षण ती आपलासा करी आणि त्याला एक वेगळं सौंदर्य प्राप्त करून देई.

एकदां ती मला म्हणाली, "मला खूप शिकायचं आहे." मीं विचारलं, "काय शिकायचं आहे?" ती म्हणाली, "सगळं शिकायचं आहे, सगळ्यांकडून शिकायचं आहे. शिकायला कांहीं विषय लागत नाहीं. काल मी एका मुलाकडून कागदाचं विमान करायला शिकलें. थांब, तुला करूनच देतें." आणि खरोखरच ती माझ्या टेबलावरचा एक कागद घेऊन त्याचं विमान करूं लागली. तिचा त्या वेळचा आवेश आणि आविर्भाव अगदीं एखाद्या सातआठ वर्षांच्या मुलासारखा होता. "माझ्यापासून तूं काय शिकलीस?" मीं तिला विचारलं. तिनं माझे दोन्ही हात हातांत घेऊन आपल्या मांडीवर ठेवले, आणि आपल्या मोठाल्या डोळ्यांत मला बुडवून म्हणाली, "तुझ्यापासून मी मला विसरायला शिकलें. एके काळीं मी फार मानी होतें. पण तुला पाहिलं आणि जी बदललें ती कायमची." मीं म्हटलं, "तूं नेहमींच अशी होतीस. मला उगाच मोठेपणा देऊन गौरवतेस झालं!" ती म्हणाली, "तुला अजून माझी माहिती नाहीं. कधीं तरी तुला सारं कळेल. जो खरोखरच देतो त्याला आपल्या दानाची ओळख नसते." मग मीहि तिला म्हटलं, "मीसुद्धां तुझ्यापासून कांहीं शिकलों आहें."

ती म्हणाली, "होय, मला माहीत आहे. उगाच कांहीं तरी बोलायला!" "नाहीं. परीकथेंतील शेवटच्या राजकन्येसारखं सालस व्हायला." मी म्हणालों. यावर ती केवळ हंसून उठली. मीं तिला तिचा कोट दिला, आणि तो घालतांना मागून तिच्या डाव्या खांद्यावर माझी हनुवटी टेकली. तिनं क्षणभरच माझा डावा हात आपल्या हृदयाशीं घट्ट दाबून धरला आणि आपल्या उजव्या हाताच्या बोटांच्या टोकांनीं माझ्या डाव्या गालावर उगाच थोपटल्यासारखं केलं आणि निघून गेली. इतकं सुख मला कधीं मिळालं नव्हतं...

समाधान ही जर मनाची एक अवस्था मानली तर सुख ही जीवनाची क्षणिक जाणीव म्हणतां येईल. अभ्यासानं किंवा तपश्चर्येनं समाधानाची वृत्ति अंगांत बाणवतां येईल. समाधानाच्या मुळाशीं परिस्थितीवर मात करण्याची ईर्षा असते. सुख हें भितरं-बुजरं असतं. तें कधीं आणि कसं लाभेल याचं गणित मांडतां येत नाहीं. परीक्षा आटोपल्यावर मनूचा शोध करण्यासाठीं म्हणून जेव्हां मी उगाच व्हिएन्नाला जायला निघालों, तेव्हांचा एक प्रसंग आठवतो. गाडींत गर्दी होती. माझ्याशेजारीं एक सतराअठरा वर्षांची मुलगी होती. बहुधा इतक्या लांब आणि एकट्यानं प्रवास करण्याची ही तिची पहिलीच खेप असावी. रात्रीचा काळोख पडतांच हळूहळू सगळेच बसल्या बसल्या पेंगूं लागले. मला कांहीं झोप येण्याचीं चिन्हं दिसेनात—गाडींत मला कधींच झोप येत नाहीं. आणि तरीहि कांहीं काळ मी झोपलों असावों असं वाटतं. कारण जेव्हां मला जाग आली तेव्हा ती मुलगी माझ्या खांद्यावर आपली मान ठेवून गाढ झोपलेली दिसली. एकाएकीं मला वाटलं कीं तिच्यासकट एकदम नाहींसं व्हावं. अतीव करुणेच्या पुरांत

दोघांनींहि दूर कुठं तरी वहात जावं. आणि मग तिची झोपमोड होऊं नये, म्हणून मी अगदीं हालचाल न करतां तसाच राहिलों. कर्णानं परशुरामाला झोपेसाठीं दिलेल्या मांडीची मला आठवण झाली. सबंध रात्र मीं तशीच काढली. त्या वेळीं मला जें कांहीं वाटलं—आणि जें आज त्या नुसत्या आठवणीनंहि वाटतं—त्याला मी सुख म्हणेन. मनूला हा प्रसंग सांगितला असता तर तिला तो किती तरी आवडला असता. तिनं अगदीं मनापासून माझं कौतुक केलं असतं.

मी व्हिएन्नाला गेलों. चारपांच दिवस राहिलों. तिथले राजवाडे, म्युझियम पाहिले. चारचौघे जें करतात तें केलं. कांहीं मागं ठेवलं नाहीं. आणि मग एके दिवशीं अचानक आणखी एक सुखाचा क्षण वेंचला. व्हिएन्ना शहर हें डान्यूब नदीच्या कांठावर वसलं आहे. जर्मनींत काळ्या जंगलाच्या कुशींत उगम पावून पूर्वेला काळ्या समुद्रांत विलीन होईपर्यंत ही नदी इतक्या विविध प्रदेशांतून जाते आणि त्यांना समृद्ध करते कीं खऱ्या अर्थानं हिला मध्य युरोपची लोकमाताच म्हणायला हवी. आर्यांची तर ही आदिमाता, कारण हिच्याच दऱ्याखोऱ्यांत त्यांचं आदिस्थान होतं असं इतिहासकार सांगतात. नदींतून सहल करण्यासाठीं लहानमोठ्या बोटी आहेत. त्या दिवशीं सकाळींच उठून मी आमच्या हॉटेलच्या समोरच धक्क्यावर पाण्याची मौज आणि बोटींची वाट पहात उभा होतों. इतक्यांत माझ्या मागून कुणी तरी म्हणालं, "आमच्याबरोबर येतां का ? आम्हांला आनंद होईल." मीं मागं वळून पाहिलं. तें एक तरुण जोडपं होतं. तिच्या पिवळ्या ड्रेसवर निळीं, किरमिजी फुलं होतीं. केसांवर एक फिकट जांभळा रेशमी रुमाल बांधलेला होता. त्याच्या हातांत एक वेताचा हॅम्पर होता. दोघांचीहि मुद्रा

इतकी प्रसन्न आणि आर्जवी होती कीं मी कांहीं आढेवेढे न घेतां त्यांच्याबरोबर बोटीवर चढलों. कोणतीहि वैयक्तिक चौकशी न करतां इतक्या अगत्यानं वागणारीं पुष्कळ माणसं युरोपांत भेटतात. त्यांच्या संस्कृतीचं हें एक वैशिष्ट्यच आहे. बोटीवर आम्हीं खूप गप्पा केल्या. तो तरुण फार बोलका दिसला. बोटीच्या कठड्यावर रेलून आम्ही उभे होतों. मध्येंच तो मला म्हणाला, "या पाण्याचा रंग तुम्हांला कसा दिसतो?" मी म्हणालों, "निळा." "मग खात्रीनं तुम्ही एक प्रेमी जीव आहांत!" तो उत्साहानं म्हणाला. "मला तर हें पाणी हिरवंजर्द दिसतं." ती तरुणी एक लटका निःश्वास टाकून म्हणाली, "माझ्यावर कुणीच प्रेम करीत नाहीं." यावर तीं दोघंजणं मोकळेपणानं हसलीं. मीसुद्धां हा वेळपर्यंत त्यांच्याशीं इतका समरस झालों होतों कीं माझ्यानंहि हंसल्यावांचून रहावेना. ब्लू डान्यूबचं हें काव्य किती सरळ आणि हृदयस्पर्शी आहे! नदीच्या पाण्याचा रंग साऱ्यांनाच निळा दिसतो. पण पूर्वापार कल्पना अशी कीं फक्त प्रेमी जीवांनाच तो तसा दिसतो. म्हणजे पर्यायानं सारेच प्रेमी. विश्वप्रेमाचं हें एक काव्यच नव्हे का? मला वाटलं कीं या प्रसंगाच्या निमित्तानं मनू माझ्यापाशींच आहे, माझ्याजवळच वावरत आहे. तिचंच रूप मी सगळीकडे पाहूं लागलों. आणि कां कोण जाणे, माझं मन हलकं झालं. सारं कांहीं अगदीं स्वच्छ दिसूं लागलं. नव्यानं लाभलेल्या त्या तरुण मित्रांच्या सहवासांत मी सारं कांहीं विसरुन गेलों. त्यांच्यां-तलाच एक झालों. बोट जेव्हां परत धक्क्याला लागली तेव्हां पुन्हां भेटण्याच्या बोलीवर आम्हीं एकमेकांचा निरोप घेतला. जातांना अगदीं अनपेक्षितपणं त्या तरुणीनं पुढं वांकून माझ्या डाव्या गालाचं चुंबन घेतलं. स्नेहाचं इतकं अकृत्रिम वचन मला ठाऊक नव्हतं.

आतां मनू माझी राहिली नव्हती. ती सगळ्यांचीच झाली होती. आणि म्हणूनच मी तिच्या अधिक जवळ जाऊं शकलों होतों. हॉटेलकडे लवकर परत जाण्याची मला आतां मुळींच ओढ उरली नव्हती. मला वाटलं कीं आपण सर्वत्र, सर्वोभूतीं आहोंत. गाड्यांची वर्दळ आणि रस्त्यावरील गडबड, हातांत हात घालून चालणाऱ्या जोडप्यांचं मूक हृद्गत, दोन्ही हात आंखूड विजारीच्या खिशांत घालून तोंडानं शीळ वाजवीत आपल्याच ऐटींत चालणारा एखादा पोरगा, रस्त्यानं मोजून पाय टाकीत जातांना मध्येंच थांबून मागं वळून पहाणारा एखादा वुड्ढा जवान, साऱ्या जगाचा भार आपणावर आहे अशा बुद्धीनं झपझप पावलं टाकीत टापटिपीनं कामाला जाणारी एखादी तरुण पोरगी—या साऱ्यांचं रहस्य मी आतां जाणत होतो. घोळून घोळून मला त्याचा आस्वाद घ्यायचा होता. एवढंसुद्धां वायां घालवायचं नव्हतं.

मनूच्या जीवनाचा मीं त्या क्षणींच वेध घेतला होता. साडेचार महिन्यांच्या अवधींत स्वर्ग आणि पाताळ यांच्या सर्व वाटा तिनंच मला दाखविल्या होत्या. देण्यासारखं आणि घेण्यासारखं कांहींच शिल्लक ठेवलं नव्हतं. वादळी सागराचं थैमान आणि शरदांतील रात्रीची नीरवता, मोना लिसाचं हांसू आणि टेसचे अश्रू, उंच उभेसोट वृक्ष आणि पहांटेच्या दंवांत न्हालेलीं गवती फुलं—या साऱ्यांचं रहस्य तिनंच मला उलगडून दाखवलं. एका अर्थानं मनू माझा कृष्ण होती. कृष्ण राधेच्या प्रत्येक वृत्तीला साथ देई, तिच्यासाठीं लहानमोठा होई. तीच अपूर्वाई तिच्या वागणुकींत होती. कृष्ण मथुरेला गेला आणि राधेचं जीवन संपलं—संपलं असं आपण समजतों. पण खरोखर तसं नव्हतं. राधाच आतां कृष्णमय झाली होती. तिचं खरं जीवन तेव्हांच सुरू झालं होतं.

मी हॉटेलमध्यें शिरलों. लिफ्टजवळ जाणार इतक्यांत पोर्टरनं एक पत्र आणि एक लहानसं पार्सल आणून दिलं. लंडनहून माझ्या बँकेनं दोन्हीहि इकडच्या पत्त्यावर पाठवून दिलीं होतीं.

खोलींत गेल्यावर मीं अगदीं शांतपणं प्रथम लिफाफा उघडून पत्र वाचायला सुरुवात केली. पत्रावर तारीख किंवा स्थळ कशाचाच उल्लेख नव्हता. पिवळसर मोहोरेदार कागद, आणि त्यावर तीं लाडकीं अक्षरं—ज्यांची मला संवय झाली होती आणि जीं आपलींशीं वाटायला लागलीं होतीं. इतकं लांब पत्र मनूनं मला केव्हांच लिहिलं नव्हतं. एखाददुसरंच वाक्य, चित्रांकित कार्डावर केवळ मायना लिहूनच खालीं खूपशा वळणदार फांद्यांतून नाजुक फुलासारखीं डोकावणारीं तिच्या नांवाचीं अक्षरं—एवढाच तिचा आजवरचा पत्रसंभार होता. पण आजचं हें पत्र निराळं होतं. पाठपोट आठ पानं. आंत जणुं तिचं जीवनसर्वस्व सामावलं होतं...

"हें पत्र वाचून तुला आश्चर्य वाटणार नाहीं अशी माझी पक्की खात्री आहे. एव्हांना आपल्या मनाचा तोल सांवरून तूं जगाशीं नव्यानं सामना करायला सिद्धहि झाला असशील. कदाचित् मला विसरलाहि असशील. पण मी जिथं आहे तिथं मात्र तुझ्याखेरीज दुसरं कांहींच नाहीं.

"आज मी जें कांहीं लिहिणार आहें त्याला कदाचित् तूं पत्र म्हणणार नाहींस. माझ्या मनाशीं मीं जो एकदां वायदा केला होता तो आज पुरा करतें आहें.

"माझी आई मला जन्म देतांच वारली. गेल्या लढाईचे ते दिवस होते. त्यांतच मी दोन वर्षांची असतांना माझे वडीलहि गेले. पहिल्यापासून मी मावशीकडेच साल्झबुर्गला वाढलें. त्यांच्याच कुटुंबांतील एक होऊन गेलें. कुणालाहि हेवा वाटावा असे माझे

ते दिवस होते. माझी प्रत्येक मिजास, प्रत्येक लहर सांभाळली जाई. मावशीलाहि मुलं होतीं—दोन मुली आणि एक मुलगा. पण त्यांच्यांत आणि माझ्यांत तिनं किंवा त्यांनींहि कधींच भेदभाव केला नाहीं. मी सर्वांत लहान. त्यामुळं माझंच कौतुक जास्त होई. मावशीचा नवरा आर्किटेक्ट होता. लढाई संपल्यानंतर त्याला चांगलीं कामं मिळूं लागलीं. भरभराटीचे दिवस आले. कार्ल, माझा भाऊ, व्हिएन्नाला शिकत होता. माझ्या दोन्ही बहिणी लवकरच लग्न करून गेल्या. मला स्वित्सर्लंडला एका मठांतील शाळेंत कांहीं दिवस पाठवण्याचं ठरलं. त्यावेळीं मला नुकतं पंधरावं वर्ष संपून सोळावं लागलं होतं.

"ही शाळा इंटरलाकनजवळ गांवापासून थोडीशी दूर आहे. शाळेंत मी काय शिकलें? चोरून पोहायला आणि आम्हांला फ्रेंच शिकवणाऱ्या बाईवर प्रेम करायला. सिस्टर हेलेना इतकी सुंदर होती कीं प्रत्येक वेळीं तिच्याकडे पाहिलं कीं माझं हृदय थांबे... आणि मग दुप्पट जोरानं धांवूं लागे. व्हीनस डी मेलोला मठांतल्या भिक्षुणीचा लांब झगा घातला कीं ती जशी दिसेल तशीच ती हुबेहुब दिसायची. तिचं बोलणंचालणं इतकं रेखीव आणि मर्यादशील असायचं कीं तिच्याशीं न बोलतांच तिच्या दंडाशीं, पांढऱ्या शुभ्र लिननच्या झग्याच्या बाहीवर गाल चोळीत रहावं असं वाटे. सर्वांशींच ती प्रेमानं वागे. त्यामुळंच कुणालाहि वाटावं कीं तिचं आपल्यावरच सारं प्रेम आहे. आम्हां मुलींत तिच्या-वरून कधीं प्रगट तर कधीं अप्रगट भांडणं व्हायचीं.

"एकदां मी रात्रीची सर्व सामसूम झाल्यावर खिडकींतून उडी टाकून तळ्याकांठच्या माझ्या नेहमींच्या जागीं पोहायला गेलें. जुलैच्या उन्हाळ्यांतले ते दिवस होते. मनाशीं कसले तरी खूप

बेत करावे आणि मग रात्रीं पाण्याशीं धिंगामस्ती करून सारं कांहीं विसरून जावं यासारखं दुसरं सुख मला माहीत नाहीं. पाण्याचे कण अशा वेळीं जणुं शरीराच्या प्रत्येक रंध्रांत शिरून सारं शरीर मोकळं करतात, साऱ्या जीवनाला एक वेगळेपणा देतात. इतके दिवस माझा समज होता कीं माझी तळ्याकांठची जागा अगदीं गुप्त होती—अगदीं माझी होती. पण आज तिथं आधींच कुणी तरी आलं होतं. मधूनमधून पाण्यांतून सराईत हातांचा आवाज येई. प्रथम मी घाबरलें. पण माझे पाय मागं वळेनात. हें नवं माणूस कोण तें बघण्याची मला उत्कंठा लागली. आणि मी एका झाडापाठीं दबा धरून राहिलें. पाण्यांतला आवाज थांबला आणि थोड्या वेळानं एक व्यक्ति कांठावर दिसूं लागली. लांबून ती कोण तें कळणं शक्य नव्हतं. पण एक मात्र कळलं. अगदीं माझ्यासारखी ती एकट्या शरीरानं पोहून आली होती. हळूहळू ती जवळ आली. मीही अगदीं डोळ्यांचा दिवा करून निरखून पाहूं लागलें. आणि मग एकदम माझं हृदय थांबलं....आणि मग दुप्पट जोरानं धावूं लागलं. माझे पाय जागच्या जागीं खिळून गेले. अगदीं खूप जोरानं ओरडावंसं वाटलं....मला कळण्यापूर्वीच मी धावत गेलें आणि मिस्टर हेलेनाच्या पायांना बिलगलें.

"तिनं अगदीं साहजिकपणं मला वर ओढून घेतलं. ती दचकली नाहीं कीं गांगरली नाहीं. 'जरा बैस' म्हणून तिनं आपले कपडे करायला सुरुवात केली. मी प्रथम गुडघ्यांत मान घालून बसलें, आणि मग कां कोण जाणे, निःसंकोचपणं सारं पाहूं लागलें. अगदीं हातरुमालएवढ्या लहानशा टुवालानं तिनं आपलं अंग टिपून घेतलं; आणि मग एकावर एक असं आपल्या कपड्यांचं अवडंबर अंगावर चढवायला सुरुवात केली—अगदीं



55429

झपझप आणि तितक्याच ठाकठिकीनं. मठांतल्या बायकांना इतके कपडे लागत असतील अशी मला कल्पना नव्हती! आणि तरीहि इतक्या सर्व प्रावरणांतून सिस्टर हेलेना एखाद्या ताज्या फुलासारखी टवटवीत दिसायची. सर्व कपडे करून झाल्यावर बूट आणि मोजे घेऊन मी बसलें होतें तिकडे ती आली. मला एकदां वाटलं कीं, झटकन् उठून तिच्या हातांतून ते घ्यावे, आणि ते घालतांना तिच्या लाललाल तळव्यांवर गाल चोळून त्यांचं हलकेंच चुंबन घ्यावं. तिनं जणूं माझ्या मनांतलंच ओळखलं. आपले बूट खालीं ठेवले, आणि खालीं बसून आपला इवलासा टुवाल माझ्या हातांत दिला. मीं तिचे पाय पुसले आणि मला अगदीं हवं होतं तसं करून तिचे मोजे चढवले आणि बूट घातले.

"नंतर ती मला म्हणाली, 'तूं पाण्यांत जाणार का? जातेस तर जाऊन ये. मी इथं राहीन.' मीं फक्त मानेनंच नाहीं म्हटलं... आणि मग एकदम बोलून गेलें, 'पुन्हा केव्हां तरी आपण दोघीहि जाऊं...'

"किती तरी वेळ आम्ही गळ्यांत गळा घालून तिथं बसून राहिलों. (त्या रात्रीनंतर पहिल्यानंच तुझ्याबरोबर असतांना लॅक ॲलनच्या पाण्यांत उतरलें होतें.)

"दुसऱ्या दिवशीं मी जणुं हवेंतच तरंगत होतें. जगांतील सारं सुख एकट्या आपणालाच मिळालं आहे याच जाणिवेनं माझे व्यवहार चालत होते. वर्गांत जेव्हां आमची दोघांची दृष्टि भिडे तेव्हां मी आंतल्या आंत नाचूं लागें....मला दुसरं कांहींच सुचेनासं होई.

"त्या दिवशीं संध्याकाळची प्रार्थना झाल्यानंतर सिस्टर हेलेना चौकांतून आपल्या खोलीकडे चालली होती. मुलींची रांग मीं

डोळा चुकवून मोडली आणि तिच्याकडे धांवतच गेलें. 'रात्रीं जेवण झाल्यानंतर मागच्या दिव्यापाशीं ये,' एवढेंच सांगून ती पुढं गेली. तिथपर्यंत धीर कसा धरायचा तें माझं मलाच कळेना. मी अगदीं बेचैन होऊन गेलें.

"ती वेळ आली. एक मिनिट झालं. दोन मिनिटं झालीं. सिस्टर हेलेना कां येत नाहीं म्हणून मी दिव्यापाशीं काळजी करीत उभी होतें. इतक्यांत ती आली. माझ्या हातांत तिनं एक आल्बमसारखं पुस्तक दिलं आणि म्हणाली, 'हें तुझ्याजवळ ठेव. तुला घे.' मी कांहीं बोलणार तोंच माझ्या केसांवर एकदां हात फिरवून ती निघून गेली. मला कांहींच सुचेना. मीं तें पुस्तक घट्ट हृदयाशीं धरलं आणि लगेच पुन्हा झग्याच्यां आंत लपविलं. त्या रात्रीं कांहीं तें पहायची सोय नव्हती. डॉर्मिटरींत सर्व मुली एकत्र झोपणार; तिथं तें बाहेर काढायलाहि जमलं नसतं. रात्रभर तें तसंच माझ्या छातीशीं लपत, खुपत होतं.

"दुसऱ्या दिवशीं दुपारच्या जेवणाच्या वेळीं मला कळलं कीं सिस्टर हेलेना मोठ्या टेबलावर नाहीं. मी जागच्या जागीं अगदीं खचून गेलें. जेवणाकडे माझं लक्षच नव्हतं. रात्रीं मिळालेलं आल्बम कीं पुस्तक मीं अजून पाहिलंहि नव्हतं. जेवण झाल्यानंतर मीं एल्सा मोलकरणीला विचारलं. तिनं जें उत्तर दिलं त्यानं तर माझ्या तोंडचं पाणीच पळालं. सिस्टर हेलेनाची स्पेनच्या एका मठांत त्याच दिवशीं सकाळीं रवानगी करण्यांत आली होती. अधिक तिला माहीत नव्हतं. कुणाला विचारायचीहि सोय नव्हती.

"त्या दिवशीं रात्रीं मला ताप भरला. ताप हटेना म्हणून माझ्या घरीं तार करण्यांत आली. मला नंतर घरीं—साल्झबुर्गला—घेऊन जाण्यांत आलं असावं; कारण त्या सातआठ दिवसांतील प्रसंग मला

आजहि अगदीं पुसटपुसट आठवतात. पुरी बरी व्हायला मला सुमारें एक महिना लागला. त्या दिवसांत माझा एकच उद्योग असे—सिस्टर हेलेनानं दिलेला आल्बम, डायरी (त्याला काय म्हणावं हें मला कळत नाहीं.) चाळीत बसावं. मीं तुला दाखविलेलं मोराचं चित्र याच डायरींतल्या एका स्केचवरून काढलं होतं. या डायरींत शब्दांपेक्षा अशीं लहानलहान चित्रंच अधिक आहेत हें तूं पहाशीलच.

"आणि मग एके दिवशीं मीं निश्चय केला. चित्रकला हस्तगत करायची. सिस्टर हेलेनाचा मला तो एक संदेशच होता. मला सर्व साहित्य देण्यांत आलं. ऑस्ट्रियांतील निरनिराळे म्युझियम मी मुद्दाम पाहून आलें. मला प्रथम लंडनला आणि नंतर पॅरिसला पाठवायचं ठरलं. आपली भेट झाली तेव्हां मी स्लेड स्कूलमध्यें शिकत होतें.

"सिस्टर हेलेनानं आपल्या डायरींत एके ठिकाणीं लिहिलं आहे: 'फुलाच्या अगदीं गाभ्यांत जाण्याचा प्रयत्न करता कामा नये. तिथं एक नुसती पोकळी असणार आणि ती तशी रहाणं यांतच त्या फुलाचं सौभाग्य आहे.' हा इशारा जसा रसिकाला तसाच तो फुलालाहि समजायला पाहिजे. फूल, त्या फुलाचं विश्व, हें सगळं ज्याच्या हृदयांत नटून उभं आहे त्याच्यासाठींच ही अनामिक पोकळी आहे. तुला मीं जेव्हां प्रथम पाहिलं तेव्हां मला या म्हणण्याची प्रचीति आली. माझ्या हृदयपुष्पाचं सौभाग्य तुझ्यापाशीं अगदीं अखंड, अबाधित राहील ही मला खात्री पटली.

"तुला कदाचित् वाटेल कीं मीं तुझ्या जीवनाशीं खेळ केला. पण खरंच, रूप, मीं तसं केलं नाहीं. सिस्टर हेलेनानं मला आपलं वारस केलं आणि आपलं हृद्गत माझ्या स्वाधीन केलं तेंच मी या

पत्रासोबत तुला पाठवीत आहें. तूं माझा वारस आहेस. तुला विचार करतां येतो. तो साध्या शब्दांत मांडतां येतो. सगळ्यांना हें सांग. ज्यांना कळेल ते उद्यां आपले वारस ठरतील.

"मी आज कुठं आहें ?—तूं विचारशील. मी टिरोलमधील एका लहानशा खेड्यांत आहें. खूप फिरतें, शेतावर काम करतें आणि चित्रं काढतें. एके दिवशीं, तुला अगदीं हवीहवीशी होईन तेव्हां तुझ्यापाशीं येईन. तोंपर्यंत आणि केव्हांहि...

तुझी *मनू*"

मनूच्या या पत्राला आज सोळा वर्षं झालीं. काळ जसजसा जातो तसतशा तिच्या स्मृति अधिकच स्पष्ट आणि उत्कट होतात. ती अजून कांहीं आलेली नाहीं. तिच्या बाईच्या—सिंस्टर हेलेनाच्या—डायरींत इतकं हृदयाचं राणीव भरलेलं आहे कीं तिथं मी इतक्या वर्षांनींहि अजून पुरता टिकलेलों नाहीं. कधीं तरी ही डायरीच मला प्रसिद्ध केली पाहिजे—पण त्यांतले शब्द आणि रेखा माझ्या होतील तेव्हां.

प्र | पा | ता | २५

# गोष्ट

**या** गोष्टींतील पात्रं दोन : एक पत्र आणि एक स्मृति.

कांहीं वेळां असं होतं कीं, भोंवतालच्या जीवनांत आपण अगदीं गुरफटून गेलों आहोंत असं वाटतं. स्वतःचं असं म्हणायला कांहींच शिल्लक उरत नाहीं. अगदीं नेमकी अशा वेळीं मनांत एक प्रकारची एक पोकळी निर्माण होते. काळ थांबतो. असंहि म्हणतां येईल कीं आपणच स्वतः काळाच्या बाहेरून अलिप्तपणानं साऱ्या गोष्टीकडं पहायला लागतों. मीं सांगतों तें पत्र अशा या पोकळींतून निर्माण झालं होतं.

ओळीमागून ओळी जशा झरूं लागल्या तशा त्या सबंध पत्राला एक हवा-हवासा आकार येऊं लागला. त्यांत एके ठिकाणीं हिंवाळ्याची पहिली झळ लागलेल्या एका झाडाचं दर्शन होतं. त्या दर्शनांत अगतिकता नव्हती असं नाहीं. अगतिकता नेहमींच हवी. पण त्याहूनहि उत्कट अशी जिजीविषा डंवरलेली होती. कौतुक वाटावं असं तें झाड होतं. झाड घरामागच्या बागेंत जरा दूर एका बांधावर होतं...आणि मग त्या लहानग्या पक्ष्याचं काय झालं? त्याचं तें परदेशी नांव लक्षांत राहायला हवं होतं. पण त्याला दिलेलं ‘ चुचवा ’ हें नांव काय वाईट होतं? किती अन्वर्थक, अनुचुचुक्! त्याचा पाय कुठंच ठरत नसे. भिरक्या इतक्या विविध आणि अनपेक्षित कीं त्यांतून चतुर्मितीचं सारं गणित शिकावं!

जरा पुढं तें झाड, तो पक्षी—कांहींच राहिलं नाहीं. मनाची

एक नेहमींची साधी ओढ : तूं मला हवा आहेस...तूं मला हवी आहेस. आभाळानं पाण्याला सांगावं; पाण्यानं आभाळाला. पण रंगाची किती कुशळाई! एक छटा पुन्हां नाहीं. ओठ, डोळे, गाल, मानेवर मागें थोडीशीच दिसणारी अगदीं सूक्ष्म पेन्सिली रेषा, वक्षांवरची ती घनावळी...सारं कांहीं आळवलं होतं— पुन्हां आणि नव्यानं. ओठ कधीं कुणाला नव्हतेच इतकी त्यांची अपूर्वाई. डोळे तर जिवाशिवाच्या सोहळ्यांत उजळलेल्या लाख दीपकळ्या...आणखी खूप कांहीं.

शेवटीं—तुला काय आवडतं? तें हें मिळालं का? मी हल्लीं खूप कामांत असतों (अगदीं उगाच; कांहीं तरी लिहायचं म्हणून? काम सुचेल तरी का?) पुन्हां लिही. लवकर लिही. केव्हां लिहिशील? वाट पहात आहे. जीव अगदी वेडावला आहे. तुझ्यावांचून कांहीं—कां—हीं—सुचत नाहीं. तुझाच...तुझाच...तुझाच...

त्याहूनहि पुढं ताजा कलम. पण तो त्यांत नव्हता. आधींच्या घोळवून काढलेल्या लहान अक्षरांनीं आणि नंतरच्या मोठ्या झालेल्या घाईच्या अक्षरांनीं पाठपोट सहा पानं भरल्यानंतर कशालाच जागा उरली नव्हती.

पत्र हें असं होतं आणि तरीही लहान होतं. मनाच्या पोकळींत जेवढं होतं तेवढं त्यांत होतं. आणि म्हणूनच त्याचा विस्तार जाणवला नाहीं. त्यांत सहजतेचं सारं अवडंबर होतं. 'तूं'पासून सुरुवात करून 'मी' केव्हां आणि कसा हरखून नाचूं लागला याचं त्यांत भानच उरलं नव्हतं. तूं मला हवी आहेस. मी तुला हवी आहेस...

पत्राच्या मागं एखादी स्मृति होती का? जें झालं, एकदा घडलं, त्याची आठवण म्हणजे स्मृति असं जर असेल तर त्या अर्थानं

म | प | ना | २१

त्यांत स्मृति नव्हती. पुढचाहि विचार नव्हता. प्रत्यक्षांतली ती रचना होती. पुन्हां तीच मनाची पोकळी. त्यांतलं तें आनंद-रूप.

आठवायचं म्हणजेहि पुन्हां रचायलाच पाहिजे. मग जें आठवायचं तें अगदीं जसंच्या तसं रचायला पाहिजे का? प्रत्येक वेळीं तें जमायचं म्हणजेहि कठिण. शिवाय त्यांत विशेष तें काय असंहि विचारतां येईल. म्हणून आठवण्याची क्रियाच टाळली गेली होती. तूं ही अशी; मी हा असा. अगदीं तशीच तूं. आणि मी? मी तिथं नव्हतोंच. तिच्या रूपाला त्यानं आपला आरसा केला आणि मग तें रूप उरलंच नाहीं. आरसा तर कधींच नव्हता. तेंहि एक तिचंच रूप होतं. समोरासमोरच्या आरशांत मग किती रूपं आणि किती आरसे! आठवायला कांहीं उरलंच नाहीं.

तसंच तें पत्रांतलं झाड. वसंतांत पुन्हा पालवी फुटून जेव्हां तें फुलूं लागलं तेव्हां त्याच्या मनांत आधींची एखादी स्मृति होती का? त्यानंच तें चाळवलं गेलं होतं का? अशांतला कोणताच हा प्रकार नव्हता. आठवण टळली म्हणून पुन्हां पालवी आली, बहर आला.

आणि तो चुचवा? तोहि पुन्हां होता. पूर्वीइतकाच चुचुंट होता—अधिकच.

# सुप्रिया

सुप्रिया हें कांहीं तिचं खरं नांव नव्हतं. कुठल्याशा एका बंगाली कादंबरींत तिनं तें वाचलं; आणि स्वतःला लावलं. दुसऱ्याच भेटींत तिनं मला हें सांगून टाकलं आणि वर, कुणाला सांगूं नका, म्हणून बजावलं. मला नंतर एक संशय आला—तेवढ्याच पुरता—कीं कदाचित् प्रत्येकाला ती तसंच सांगत असावी. तसा मीं तिच्या नांवाचा कधींच फारसा विचार केला नाहीं. नांव काय, एकासारखं दुसरं असतं! मनांत घोळवलं आणि उगाच कागदावर, वहींत, पुस्तकांत कोरून वळवायला लागलं कीं कोणतंहि आपलंसं वाटायला लागतं.

आमच्या आंघोळीच्या खोलींतून सुप्रियेच्या आतेची खोली दिसत असे. तिच्याकडेच ती रहायची, आमच्याच खालीं. पण घराची रचना अशी होती कीं खालचीं बिऱ्हाडं आमच्या आंघोळीच्या खोलींतून तेवढीं दिसायचीं. दारं लावून आंघोळ करायची आजच्यासारखी आदत त्यावेळीं नव्हती. खोलींत बसल्याबसल्या अंगावर थोडं-थोडं पाणी घ्यावं आणि खालीं सुप्रिया दिसते का हें मीं पहावं. आणि तिनंहि पाहिलं न पाहिलंसं करून आंतबाहेर घुटमळावं.

सुप्रियाच्या पायांत चांदीचे तोडे होते. पहिल्यांदाच मी तसले पाहिले होते. तिच्या तांबुसगोऱ्या पायांना ते शोभून दिसायचे. एकदां मीं वरून एक चिठ्ठी टाकली. आंत लिहिलं होतं, "तूं

तोडे घालतेस म्हणून सुंदर दिसतेस, कीं सुंदर आहेस म्हणून तोडे घालतेस ?" दुसऱ्या दिवशीं मी आंघोळ करायला बसलों होतों, तेव्हां तिनं सहज साडी झटकल्यासारखी करीत आपले तोडे काढलेले पाय दाखवले; आणि मग जीभ काढून दाखवली.

एके दिवशीं घरीं कुणींसं म्हटलं कीं सुप्रियाचं लग्न ठरलं आहे. हरद्याच्या कुणा मालगुजाराच्या तिसऱ्या कीं चौथ्या मुलाबरोबर. सगळ्यांनाच बरं वाटलं असं दिसलं. मुलगी श्रीमंतांच्या घरीं पडणार होती. कोण, कुठला, ठाऊक नसलं म्हणून काय झालं ? सुप्रिया मात्र नेहमींसारखी दिसेनाशी झाली.

तीन-चार दिवसांनीं नाक्यावर इराण्याच्या दुकानाशीं मी उभा असतांना तिनं मला पाहिलं आणि जवळ आली.

"मी तुला एक विचारूं का ?"

"इकडे तूं कुठें ?" मीं उगाच कांहीं तरी टाळाटाळ करायला वर म्हटलं.

"तूं माझ्याशीं लग्न करशील का ?"

मला कांहींच समजलं नाहीं. मी म्हणालों, "तें कसं शक्य आहे ? तूं माझ्यापेक्षां मोठी—चारपांच वर्षांनीं तरी !"

"म्हणून काय झालं ? आपण दोघंहि पळून जाऊं या !"

"पळून ?" मीं म्हटलं, "आणि कुठें ?" मी काय म्हणत होतों, हें माझं मलाच कळत नव्हतं.

सुप्रिया आणखी थांबली नाहीं.

दुसऱ्या दिवशीं वाडींत एकच बातमी. सुप्रिया कुणाबरोबर तरी पळून गेली होती.

# बिन्दो

बिन्दोला मीं प्रथम लखेरीच्या बाजारांत पाहिलं. पांचपंचवीस लोकांच्या घोळक्यांत आधींच मागं मोकळी असलेली चोळी पुढं उघडी करून ती बिनदिक्कत उरावर कांहीं तरी गोंदवून घेत होती.

लखेरीला बदलून येऊन मला थोडेच दिवस झाले होते. असल्या प्रकाराची मला अजून संवय नव्हती. चोरट्या नजरेनं मी नकळत त्या बघ्यांच्या गर्दींत सामील झालों. थोड्याच वेळांत इतरांची तटस्थता पाहून मला लाजल्यासारखं झालं आणि मग तें सारं मोकळवाणं वातावरण पाहून मन एकाएकीं उल्लसित झालं.

बिन्दो अगदीं निश्चल बसली होती. जणूं एवढ्या मोठ्या घोळक्यांत तीच एकटी होती. सुई टोचतांना पापणीहि हलायची नाहीं. गोंदणाराचं कौशल्य अधिक कीं तिची सहनशीलता अधिक हें ठरविणं कठिण होतं. गोंदवून संपल्यावर तिनं कसलीच घाई न करतां चोळीची गांठ बांधली आणि सहज तोऱ्यांत उठून गोंदणाऱ्याच्या हातावर पावलीचं नाणं ठेवलं. लोकांची कुजबुज सुरू होण्याआधींच कांहींनीं तिला जायला वाट करून दिली.

"ही बिन्दो, मोनसी गवळ्याची बायको." एक जण म्हणाला.

"दर बाजाराला हल्लीं कांहीं तरी गोंदवून घेते." दुसरा म्हणाला.

"नवरा असतांना?" मधेंच उत्तराची अपेक्षा नसलेल्या एकानं प्रश्न टाकला.

"कारखान्यापाशीं रोज दूध विकायला येते." आणखी एकानं माहिती पुरविली.

जमाव पांगला. गोंदणारा तसाच आपली सुई पुशीत बसला होता. मला तिथंच उभा पाहून तो स्वतःशींच हंसला आणि म्हणाला, "तुम्ही इकडे नवीन दिसतां ?"

"हां." मी म्हणालों.

"मोठी चलाख पोर आहे, बिन्दो." माझ्या मनांतलं तो म्हणाला. "पहिल्यानं तिच्या दंडावर मीं भुजंग गोंदला. अगदीं खराखुरा, चित्रांतल्याप्रमाणं तिला हवा होता. मला एक तास लागला, पण डोळ्यांतून पाणी नाहीं कीं तक्रार नाहीं. मग गळ्याभोंवतीं हार झाला. आज उरावर मोर गोंदवून घ्यायला आली होती. मीं म्हटलं, 'मोर मोठा होईल. लहानसं फुलपाखरूं जमवूं.' पण तिनं कांहीं ऐकलं नाहीं."

"गवळण आहे ?" मीं म्हटलं.

"हो. तुमच्याच कारखान्याजवळ तिचीं गिऱ्हाइकं आहेत." गोंदणारा म्हणाला.

इतक्या जवळ असून ही दिसली नाहीं कशी याचाच मी विचार करीत होतों.

घरीं गेल्यावर मग्याला सांगितलं, "दूध हल्लीं बरं नसतं. बदललं पाहिजे."

तो आपण होऊनच म्हणाला, "बिन्दोला सांगतों. बाजूचे सारे ठाकूर तिच्याकडूनच घेतात."

"हां," मी अर्धवट पुटपुटत म्हणालों, "तिला सकाळीं भेटायला सांग."

दुसऱ्या दिवशीं बिन्दो आली तेव्हां मी कामावर जायला कपडे

करून तयार होतों. "दूध चांगलं हवंय" मी म्हणालों, "मागाहून गडबड नको. दर काय तुझा?"

अगदीं थेट डोळ्याला डोळा भिडवून ती म्हणाली, "चार आणे."

"मी आठ आणे देईन. कांहीं तक्रार येतां कामा नये." मी तिच्याकडं न पहातांच म्हणालों.

बिन्दो त्या दिवशींच्या बाजारांतल्या सफाईनं चोळी उघडी करीत म्हणाली, "हें सगळं मोनसीचं आहे...तुम्हांला काय पाहिजे तें सरळ सांगा."

माझी मलाच शरम वाटली. बाजारांतला तो सर्व प्रसंग माझ्या डोळ्यासमोर उभा राहिला. मन हलकं झालं. अगदीं निर्मळपणं तिच्याकडे पहात मी म्हणालों, "बरं तर उद्यांपासून. चार आणे ठरले."

"आज असंच घ्या. खूप आहे. गेल्या बाजारालाच दोन गाई व्याल्या." ती म्हणाली.

मग्या कुठं तरी गेला होता. मींच दूध घेऊन ठेवलं.

बिन्दो नंतर रोज दूध घालायला येई. कधीं थट्टामस्करीहि करी. आधींचं सारं तिनं मला विसरायला लावलं होतं.

म | न | जा | ४४

# अमित्रा

**मी** कांहीं मुद्दाम तिच्या गुडघ्याला गुडघा लावून बसलों नव्हतों. गाडीच लहान आणि स्टेशनपासून हॉटेलपर्यंत जाणारे आंत पांच उतारू. समोरासमोर कितीहि अंग चोरून बसलं तरी एकमेकांच्या गुडघ्यांना गुडघे न लागणं अगदीं अशक्य होतं.

पण तिनं आपण होऊन जेव्हां आपले पाय अधिक आंखडून घेतले आणि एक जळता दृष्टिक्षेप माझ्याकडं टाकला तेव्हां मात्र मला तें आवडलं नाहीं. कासवासारखे सारे पाय पोटांत घेऊन एकदम अगदी निश्चल होऊन बसावं असं मला वाटलं....मात्र तिच्याकडं पुन्हां पाहिल्यावर कासवासारखं दगडी लोळागोळा होऊन रहाणं अशक्य होतं.

इतका वेळ पायाशीं पाय लगटून होते. बाजूला झाल्यावर त्यांना आलेली घामाची तिरीप मला जाणवली. दुपारच्या त्या उन्हांतहि मधेंच कुठून तरी वाऱ्याची एक झुळूक त्या गाडींतल्या गर्दींत आली आणि पाय फुंकरले गेले. त्यांना एक वेगळाच थंड-गरम मोकळेपणा आला...तिलाहि तसंच झालं असेल का? एक मिस्किल विचार माझ्या डोक्यांत येऊन गेला.

गाडी चालली होती, आणि हॉटेलपाशीं येईपर्यंत मी समोर तिच्याकडं भटकत्या मनानं पहात होतों. तिनं मात्र एकदांसुद्धां पुन्हां माझ्या डोळ्याला डोळा भिडवला नाहीं.

हॉटेलची इमारत—इमारत कसली, एकमजली जुन्या पद्धतीचं

तें घर होतं!—मुख्य रस्त्यापासून जरा दूर एका बाजूच्या गल्लींत होती. गल्लीला दगडी फरशी होती; टोंकाला हॉटेल आणि पुढं एकदम रस्ता संपला होता. गल्लींत गाडी शिरतांच पुन्हां एकदां जोराचा हिसका बसला. फरशीवरून गाडी जातांना हिसके बसतच होते. मी अपराधी पायांना आवरून घेईपर्यंत गाडी थांबली. पहिल्यांदा मी उतरलों.

बाकीचे उतारू नेहमींचे परिचित पाहुणे दिसले. सामानाची फिकीर न करतां ते तडक आंत शिरले. माझं स्वतःचं सामान कांहीं फारसं नव्हतं—एक सूटकेस आणि होल्डॉल. इतक्यांत मला आठवलं की तिच्याजवळ तर सामान मुळींच नव्हतं.

ती उतरली, माझं सामान उतरून घेणाऱ्या पोऱ्याला सफाईंत कांहीं सिंहलींत विचारलं आणि आंत शिरली. आलेल्या उतारूंत मीच तेवढा एक अपरिचित ठरलों.

माझी खोली वरच्या मजल्यावर मागल्या बाजूला होती. खोलीच्या मानानं खोलीला असलेली एकच खिडकी मला पुष्कळच मोठी वाटली. खिडकींतून मागं एक लहानसा मळा दिसला. पलीकडे दुसऱ्या कुठल्यातरी रस्त्याच्या पिछाडीचीं दोन-तीन घरं होतीं. खिडकीशींच एक शेवग्याचं झाड होतं. त्याच्या जाळींतून सगळा देखावा एखाद्या सूक्ष्म रेखाचित्रासारखा दिसला.

संध्याकाळच्या आंत मला पुष्कळ कामं उरकायचीं होतीं, जयवर्धनांना भेटून कॉंट्रॅक्टच्या अटी पक्क्या करून घ्यायच्या होत्या. भारत आणि लंका यांच्या दरम्यानचं राजनैतिक वातावरण अधिक तंग होण्यापूर्वी कंपनीचा करार कौशल्यानं पुरा करून घ्यायचा होता. खोलींत सामान येऊन पडल्यावर मीं प्रथम स्नानाची व्यवस्था करवून घेतली, कॉफी मागवली आणि कपडे करून बाहेर पडलों.

परत येईपर्यंत मला नऊ वाजले. दुपारचा प्रसंग मी जवळजवळ विसरून गेलों होतों. जिना चढून वर आलों आणि खोलीचं दार उघडलं.

"अहो!" म्हणून एक किंचाळी ऐकली. मी चुकून तिच्या खोलींत शिरलों होतों.

"हाउ डेअर यू!" ब्लाऊज काढण्यासाठी पंखावलेले हात झटदिशीं खालीं करून ती म्हणाली.

"माफ करा!" मी इंग्रजींतच म्हणालों, "मला वाटलं, माझी खोली."

आणि वळून मागं फिरतांना मला काय वाटलं कोण जाणे मी सहज बोलून गेलों, "पण तुम्हीं कडी कां लावली नाहीं?"

"तो माझा प्रश्न आहे." ती त्याच स्वरांत म्हणाली, "इतकं साधंहि तुम्हांला कळूं नये?"

मीं तिच्या खोलीचं दार लावून घेतलं आणि माझ्या खोलींत आलों. शेजारीं शेजारीं खोल्या असल्यामुळं हा घोटाळा झाला होता.

जेवण बाहेर झालं होतं. सकाळीं लवकर उठून परत गांठीभेटी घ्यायच्या होत्या. दुपारच्या गाडीनं मीं परत तलाइमनारला जायला निघणार होतों. झोंप येण्याचीं चिन्हं दिसेनात, म्हणून रिपोर्ट लिहायला बसलों. एक-दोन पत्रंहि लिहून पुरीं करायचीं होतीं.

तास-दीड तास झाला असेल. वेळ केव्हां गेला तें मला समजलंहि नाहीं. थंडी पडायला सुरवात झाली होती. मीं उठून बिछान्यावरचा येतांना नवीनच खरेदी केलेला रग शालीसारखा लपेटून घेतला आणि पुन्हां कामाला लागलों.

इतक्यांत दारावर थाप ऐकूं आली. उठून दार उघडलं. तों तीच उभी होती.

"तुम्ही अजून किती वेळ दिवा उघडा ठेवणार आहां?" ती म्हणाली, "मला त्रास होतो आहे."

माझ्या लक्षांत आलं कीं आमच्या खोल्यांमधील पार्टिशनचा वरचा भाग कांचेचा होता.

"माफ करा हं," मी म्हणालों, "हें सारं आवरून दिवा काढून टाकतों."

मीं दार लावून घेतलं. कागद, पसारा आवरला आणि दिवा मालवून बिछान्यावर पडलों. थंडी वाढायला लागली होती.

माझा किंचित डोळा लागला असेल इतक्यांत कुणी तरी बोलत आहे असं मला वाटलं. आवाज शेजारच्या तिच्या खोलींतून येत होता. मला थोडंसं आश्चर्य वाटलं—थोडी भीति; आणि मग तिच्या बाबतींत कांहींहि शक्य आहे या विचारानं समाधानहि वाटलं.

आवाज थांबला. माझी झोंप आतां पार उडाली होती. सुमारें पंधराएक मिनिटांनीं गाण्याचे सूर ऐकूं येऊं लागले. मला कांहींच कळेना. भुताटकी तर नाहीं ना अशीहि शंका डोकावून गेली.

मी उठलों; दिवा लावला व रग अंगाशीं लपेटून बाहेर आलों. व्हरांड्यांत, जिन्यावर—सगळीकडं सामसूम होतं. स्वर अजून येतच होते. नक्कीच तिच्या खोलींतून येत होते.

दार ठोठावून मघाशीं तिनं विचारलेले प्रश्न तिलाच पुन्हा विचारावे असं मनांत आलं.

दाराला हात लावतांच तें उघडलं. आंतून कडी लावलेली नव्हती. माझ्या खोलींतील दिव्याचा प्रकाश याहि खोलींत लख्ख पडला होता.

थोडा धीर करून मी पुढं झालों. खाटेवर एखाद्या लहान मुलासारखी पोटाशीं दोन्ही पाय घेऊन डाव्या कुशीवर ती स्वस्थ

झोपली होती. श्वास संथ आणि सहज येत होता. कपाळावर दोन घामाचे ठिपके दिसले.

गाण्याचे सूर ऐकूं येईनासे झाले. मी तसाच क्षणभर तिच्याकडे पहात राहिलों. तिनं कांहींच हालचाल केली नाहीं. ती गाढ झोपली होती हें निश्चित.

आणि मग मला एकाएकीं जाणवलं कीं जवळ कांहींच सामान नसल्यामुळं ती तशीच पांवरुणाशिवाय झोपली होती. मीं माझ्या अंगावरचा रग काढला आणि हलकेच तिच्या अंगावर घातला. ती जागी झाली तर?...पण ती जागी झाली नाहीं. मी माझ्या खोलींत येऊन बिछान्यावर पडलों.

सकाळीं उठायला मला थोडा उशीरच झाला. बहुतेक ती येणार आणि कांहीं तरी सुनावणार अशी मी अपेक्षा करीत होतों. पण कांहींच झालं नाहीं. तिच्या खोलींत तर कोणतीच हालचाल ऐकूं येत नव्हती.

मी ब्रश, टूथपेस्ट आणि टुवाल घेऊन खालीं तोंड धुवायला गेलों. ती जाण्याच्या तयारींत होती हॉटेलमालकांशीं कांहीं संभाषण चाललं होतं. तिच्याबरोबर आता एक पुरुष होता, सामानहि होतं. सामान हॉटेलच्या गाडींत ठेवलं गेलं. तीं दोघं बसलीं. तिनं मला पाहिलं होतं, पण कोणतीच ओळख दाखविली नाहीं. गाडी फरशीवरून आवाज करीत निघून गेली.

मला विनाकारण चुटपुट लागली. कॉफी घेऊन जेव्हां हॉटेलचा पोऱ्या खोलींत आला तेव्हा मीं त्याला माझ्या मोडक्या सिंहलींत विचारलं, "रात्रीं कुणी गात होतं?"

तो हंसला आणि मला तामिळमध्यें म्हणाला, "होय, लच्छम्मा —जेवण करणारी लच्छम्मा. तिची अटच आहे, आपण वाटेल

तेव्हा गाणार. तिचं जेवण फक्कड असतं म्हणून मालक किंवा गिऱ्हाइकं त्याबद्दल तक्रार करीत नाहींत."

मी स्वतःशींच हंसलों, वरमलों.

"हो," तो पोऱ्या पुढं म्हणाला, "शेजारच्या खोलींतील बाईनं तुम्हांला द्यायला एक चिठ्ठी दिली आहे."

त्यानं चिठ्ठी दिली. चिठ्ठींत तिनं इंग्रजींत लिहिलं होतं :

"—आज पहाटे माझं हरवलेलं सामान आलं. पतिराजहि आले. आतां त्यांच्याबरोबर पुढची मजल गांठायची आहे.

"तुमचा रग मिळाला....पण मी तुमचे आभार मानूं शकत नाहीं. रग मी घेऊन जात आहें. तुम्हांला कांहींतरी शिक्षा हवीच होती!—सुमित्रा."

त्या दिवसाच्या माझ्या कार्यक्रमाचा विचार करणं एवढंच नंतर बाकी होतं.

# अनुराधा

हरिहरला मी असतांना माझ्या शेजारीं एक बंगाली इंजिनियर होते. त्यांच्या घरीं एकदां कलकत्त्याहून त्यांची एक पुतणी कॉलेजच्या सुटींत आली. साधीभोळी, खूप बोलणारी, डोळे तरंगते ठेवून दुसऱ्याला नेहमीं बुचकळ्यांत पाडणारी. तिची ओळख करून घेण्याचा प्रश्नच नव्हता. तिनंच स्वतः पहिल्याच भेटींत आपली संपूर्ण ओळख करून दिली. नांव : अनुराधा दासगुप्ता; वय : वर्षे १८; वास्तव्य : राशविहारी ॲव्हेन्यू, कलकत्ता; वडील : कलकत्ता म्युनिसिपालिटीत असिस्टंट मेडिकल ऑफिसर; पांच भाऊ आणि दोन वहिणी—अमुककुमार, तमुकचंद्र, इत्यादि इत्यादि.

मी एकटा. दासगुप्तांची चांगली ओळख. जाणंयेणं नेहमींच असायचं. अनुराधेची व माझी ओळख जमायला फारसा वेळ लागला नाहीं. "रूपबाबू, तुम्हीं तुमच्या केसांचा भांग मधें पाडायला पाहिजे....रूपबाबू, तुम्ही सकाळीं उठून फिरायला कां जात नाहीं?....रूपबाबू, तुम्ही योगासनं कां करीत नाहीं? मी रोज करतें. हवं तर शिकवीन सुद्धां तुम्हांला....रूपबाबू, तुम्ही रात्रीं बाराबारा वाजेपर्यंत खरंच कां वाचत बसतां? आणि काय वाचतां?...रूपबाबू, मी तुम्हांला एक पहाडी काठी पाठवून देईन. आमच्या घरचा गढवाली खानसामा किती तरी दर वर्षी घेऊन येतो."

एकदां रविवारीं दुपारीं अनुराधा एक इंग्रजी पुस्तक घेऊन

आली. दुसऱ्याचे विचार कसे ओळखावे या किंवा अशाच विषयावर त्यांत लेखकानं आपले प्रयोग मांडले होते. एखादी वेळ ठरवून त्याच वेळीं दोघांनीं एकमेकांना आठवायचं. कांहीं दिवसांनीं दोघांनाहि एकमेकांच्या मनांत काय चाललं आहे तें कळूं लागतं.

आणि अनुराधा म्हणाली, "रूपबाबू, आजपासून रोज रात्रीं नऊ वाजतां आपण एकमेकांना आठवायचं. मी हा प्रयोग करून पहाणार आहें."

मीं म्हटलं, "नऊच कां? त्यावेळीं तर तुमचीं जेवणं चाललेलीं असतात."

"जेवतांना अशी आठवण काढायला मला सोपं जातं." ती म्हणाली. "आणि शिवाय त्यावेळीं आपण काय करतों हें कुणाच्याच लक्षांत येत नाहीं."

मीं म्हटलं, "छान; आणि त्यामुळं अन्नपचनहि चांगलं होत असेल!"

संध्याकाळपर्यंत मी हें सगळं विसरून गेलों होतों. रात्रीं एका मित्राकडे जेवायला गेलों होतों. जेवण अर्ध्यावर आलं होतं, इतक्यांत घड्याळांत नवाचे ठोके पडले. मला दुपारचा वायदा आठवला. पण मनांत म्हटलं, या पोरीची आठवण करायची म्हणजे तरी काय? थोड्या वेळानं ताटांतल्या वांग्याच्या भाजीवरून तिच्या फिकट अंजिरी रंगाच्या पोलक्याचीच आठवण झाली. या पोलक्यांत ती विशेष खुलून दिसायची म्हणून कीं काय, बहुतेक वेळां तोच तिच्या अंगांत असायचा. वापरून वापरून पोलक्याचं कापड आतां थोडं विरायला लागलं होतं. पण त्याहि अवस्थेंत तो तिला सुंदर दिसायचा. तिला माहितहि नव्हतं कीं अंगांत घातल्यावर तो हवा तिथं ताणला जात होता. तिला हें सांगावं

असं एकदां माझ्या अगदीं ओठांवर आलं होतं. पण तिला स्वतःला हें समजायला नको होतं का? आणि मग मला वाटलं कीं खरोखरच तिला हें कधींच समजलं नसावं. पोलक्याचं कापड अनाठायीं असं विसविशीत झालं आहे याची त्या पोलक्याच्या प्राकृतिक अवस्थेवरून तिला कशी कल्पना येणार? 'यौवनमुपालंभस्व' अशा शेरा मारणाऱ्या प्रियंवदेकडून चोळीची गांठ सैल करून घेणाऱ्या शकुंतलेला जशा कांहीं गोष्टी कळतच नव्हत्या तसंच अनुराधेचंहि होतं.

अनुराधेचा हा पहिला आठव. जेवण केव्हां संपलं, कसं संपलं, घरीं केव्हां आलों, मला कांहींच कळलं नाहीं. चार दिवस अनुराधाहि भेटली नाहीं. म्हैसूरला नेहमींचीं प्रेक्षणीय स्थळं बघायला ती कुणाबरोबर तरी निघून गेली होती.

म्हैसूरहून आलेल्या दिवशींच ती संध्याकाळीं माझ्या घरीं आली, नऊच्या आठवणीचा विषय मीं मुद्दामच काढला नाहीं. अनुराधाहि कांहीं बोलली नाहीं. मात्र आपल्या सफरीचा साद्यंत वृत्तांत सांगतांना मधेंच ती म्हणाली, "म्हैसूरहून मीं तऱ्हेतऱ्हेच्या साड्या आणि ब्लाउज-पीसेस आणले आहेत. तुम्हांला ते खात्रीनं आवडतील. मला हवं तसलं अंजिरी रंगाचं कापड मात्र मिळालं नाहीं." (मीं मनांत म्हटलं, "कांहीं हरकत नाहीं.") "तुमच्या-साठीं सुद्धां आज कांहीं आणलं आहे." बरोबर आणलेला डबा तिनं उघडला. आंत बंगाली तऱ्हेची वांग्याची भाजी होती.

त्यानंतर तीन महिन्यांच्या कालावधींत बऱ्याच गोष्टी होऊन गेल्या. हरिहरची नोकरी सोडून मी इंदूरला टेलिफोन कंपनींत असिस्टंट मॅनेजर म्हणून गेलों. सुटी संपण्यापूर्वींच अनुराधेचं लग्न झाल्याचं दासगुप्तांकडून कळलं. नवरा कोचीनला नेव्हल कमोडर

होता. त्यासाठींच तिची ही दक्षिणयात्रा घडवून आणण्यांत आली होती असंहि त्यांनींच कळवलं. आपल्या चतुराईची त्यांनीं आपणच प्रशंसा केली होती...स्वतः अनुराधेचं काय म्हणणं होतं हें मला कळायला कांहींच मार्ग नव्हता. खरं सांगायचं म्हणजे मीं या घटनेचा त्यावेळीं इतक्या आत्मीयतेनं विचारच केला नाहीं. नव्या वातावरणांत मी रुळूं पहात होतों; नव्या जबाबदाऱ्या स्वतःच्या हिंमतीवर पार पाडण्यांत गढून गेलों होतों.

एके दिवशीं रात्रीं अचानक अनुराधा एकटीच माझ्याकडे आली. बरोबर खूपसं सामान होतं. मला प्रश्न विचारायला तिनं अवसरच दिला नाहीं. सतत बोलणं आणि धांदल. पहिल्यापेक्षांहि अधिक मोकळेपणा.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तिनं माझ्या घराचा कबजा घेतला. काय करावं हें मला समजेच ना. सबंध बारा तासांच्या अवधींत तिनं एकदांसुद्धां आपल्या नवऱ्याचा, घरांतील माणसांचा, हरिहरच्या मंडळींचा उल्लेखहि केला नाहीं. आणि तरीहि तिची वृत्ति पूर्वीपेक्षां आनंदी दिसली.

ऑफिसमध्यें गेल्यावर मीं प्रथम दासगुप्तांना एक सविस्तर पत्र घातलं. एकंदर प्रकार काय आहे तो लगेच कळविण्याबद्दलहि लिहिलं. दुपारीं मुद्दाम घरीं जाऊन आलों. संध्याकाळीं लवकरच परतलों.

चहा तयार होता. थोड्या वेळानं अनुराधा मधेंच म्हणाली, "मीं इथं राहूं नये असं तुम्हांला वाटतं?"

"असं कसं होईल?" मीं भानावर येऊन म्हणालों, "तुझ्या येण्यानं मला कितीतरी आनंद झाला आहे. त्यावेळीं तूं अचानक निघून गेली होतीस."

"हो, पण एकमेकांची आठवण करायची या बोलीनं. तुम्हीं तसं केलं नाहीं. आज काकांनाहि पत्र लिहून टाकलंत."

"मीं तसं करायला नको होतं?"

"तें मी कसं सांगूं?..." पुढं ती बोलली नाहीं.

दुसऱ्याच दिवशीं सकाळीं मीं प्रथम दासगुप्तांना तार केली : "सर्व कांहीं ठीक आहे." पत्रांत लिहिलं : "अनुराधा इंदूरला कांहीं दिवस रहाणार म्हणते. तिला राहूं द्यावं. माझ्यावर विश्वास ठेवावा."

पुढच्या घटना खूप गाजल्या; पण अनुराधेच्या आणि माझ्याहि दृष्टीनं त्यांना फारसं महत्त्व उरलं नव्हतं.

दासगुप्ता एकदां येऊन गेले. माझी नेमणूक रद्द व्हावी म्हणूनहि त्यांनीं नंतर खटपट केली. अनुराधेवर तिच्या नवऱ्यानं घरांतील दागिने व मौल्यवान वस्तू चोरल्याचा आरोप ठेऊन फिर्याद केली. त्रास खूप झाला; पण एकदांसुद्धां तिची आनंदी वृत्ति चळली नाहीं. मी मात्र पुरा बदलून गेलों.

# पल्लवी

गोपीपुऱ्यांत मी रहायला आलों आणि माझ्या अडचणींना सुरुवात झाली. जागा लहान आणि कोंदट. घरं इतकीं जवळ, एकांत एक मिसळून गेलेलीं, कीं रस्त्यांना आणि अंगणांना कांहीं अर्थच उरला नव्हता. त्यांत माझी आणखी एक अडचण म्हणजे मला सायकल येत नव्हती. गल्ल्यांच्या काटकोनांतून मार्ग काढीत पंधरा-वीस मिनिटांनीं स्टँडवर जायचं. तिथून बस घेऊन किंवा टांगा करून तीन मैलांवरच्या गांवाबाहेरील कारखान्यांत जायचं. दुसरी अडचण जेवणाची. लखेरीला असतांना जेवण हातानं करण्याची मीं संवय लावून घेतली होती. पण इथं तशी सोयहि नव्हती आणि सवडहि नव्हती.

जवळच एक भिशी आहे म्हणून समजलं म्हणून दोनतीन दिवसांनीं चौकशी केली. प्रथम माझ्या विचारणेकडे कुणीं फारसं लक्षच दिलं नाहीं. भोंवतालची सारी वस्ती जरा आडमुठीच होती. प्रत्येक जण आपल्याच तोऱ्यांत आणि गुमींत. परस्थाची वास्तपुस्त करावी, निदान त्याच्याविषयीं कुतूहल दाखविण्याइतपत टोकळेबाज ग्रामीण स्वभावविशेष प्रगट करावा असं कुणालाच वाटत नव्हतं. पण अशा परिस्थितींतहि मी थोडीबहुत माहिती काढूं शकलों. ज्यांनीं दिली त्यांनीं एक भयानक चित्रच माझ्यापुढं उभं केलं. भिशी होती एका काठेवाडी बाईची. कोणे एके काळीं ही बाई एका गोऱ्या सोजिराकडे होती; पण या बाईपेक्षां तिच्या

मुलीचीच कीर्ति जास्त. पल्लवीसाठीं गांवांत आजपर्यंत कितीतरी मारामाऱ्या झाल्या होत्या. एकानं तिला पळविण्याचाहि प्रयत्न केला होता. कुणी म्हणत, तीच स्वतः पळून गेली होती, आणि मग कंटाळून परत आली होती. खुनाचींहि भाषा तिच्या संबंधांत दबून बोलली जाई. अशा परिस्थितींत भिशी चालली होती हेंच नवल !

मी माझ्या पद्धतीप्रमाणं दोन आणि दोन यांचा हिशेब करूं लागलों. एक अनाथ बाई आपल्या मुलीसह जगण्याची धडपड करीत आहे आणि टवाळ कुटाळकंपू तिला उठवून लावण्याचा प्रयत्न करीत आहे. आपण पुढं झालं पाहिजे, त्यांना हात दिला पाहिजे, असा एक डॉन किशोटी विचार येई. मग वाटे, कांहींतरी पाणी मुरत असल्याशिवाय लोक कांहीं असं बोलणार नाहींत. पल्लवीला पहाण्याची इच्छा मात्र बळावली. तिच्याशीं जपून वागलं म्हणजे झालं—तिच्या आईशींहि. आपणाला काय, दोन वेळां जेवायचंच !

भिशींत मी गेलों तेव्हां गोपीपुऱ्यांतील नेहमींच्या पद्धतीप्रमाणं पांच मिनिटं माझी कुणी दादच घेतली नाहीं. आंतल्या काळोख्या खोलींतून थोड्या वेळानं एक बाई बाहेर आली. तीच पल्लवी असावी असं मीं ताडलं. भर उन्हाळ्याच्या दिवसांत दुपारीं लाल पालवीनं फुटलेला पिंपळ सळसळावा तशी ती दिसली. थोराड तितकीच नाजुक; अनघड आणि खुशाल.

"माझी जेवणाची सोय होईल का ?" मीं विचारलं.

"तीस रुपये पडतील—महिन्याचे. पैसे आधीं द्यावे लागतील," ती म्हणाली.

"आधीं ?" मी म्हणालों.

"हो, आम्हांला धोका पत्करणं परवडत नाहीं. लोक खाऊन जातात; परत तोंड दाखवीत नाहींत."

मीं मुकाट्यानं रुपये मोजून तिच्या हातावर ठेवले.

"कोण आहे ?" मला वाटतं, आंतून तिच्या आईनं विचारलं.

"गिऱ्हाईक आहे." ती पैसे लपवीत म्हणाली. "आज रात्रींपासून या. आतांचीं जेवणं झालीं आहेत."

मला जवळजवळ बाहेरच रेटून तिनं दार लावून घेतलं. दुपारच्या जेवणासाठीं पुन्हां कुठं तरी हुंगीत जाणं भाग होतं. तीस रुपये हातोहात गेले कीं काय ही शिवाय भीति होतीच.

पण तसं कांहीं झालं नाहीं. रात्रीचं जेवण मिळालं. नंतरहि रोजचं जेवण बिनबोभाट मिळूं लागलं. भिशींत जेवायला येणारी तशी फारशी माणसं दिसत नव्हतीं. प्रत्येकाची वेळ निरनिराळी असल्यास कोण जाणे! बहुधा मी जाईं तेव्हां मीच एकटा असें. गुपचुप जेवण आटोपून मी निघून जाई. पल्लवीची मीं पहिल्याच भेटींत धास्ती घेतली होती.

एके दिवशीं दुपारीं मी जेवत असतांना ती मध्येंच म्हणाली, "तुम्हांला बहीण आहे काय ?"

मी म्हणालों, "नाहीं."

"तुम्हांला बायको नाहीं हें तर उघडच आहे!" ती पुढें म्हणाली. "इतके दिवस झाले पण तुम्हीं कधीं तोंड वर करून पाहिलं नाहीं."

मीं तिच्याकडं पाहिलं. तिच्या दोन्ही डोळ्यांतले मोर नाचत होते. मी पुन्हां मान खालीं घालून जेवूं लागलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी जेव्हां जेवायला गेलों तेव्हा भिशींतील एकंदर वातावरण तंग होतं असं दिसलं. जेवणाचा पत्ता

नव्हता. माझ्याप्रमाणंच आणखीहि एक इसम वाट पहात बसला होता. पंधरावीस मिनिटं वाट पाहिल्यावर उठून जावं कीं काय हा मी विचार करीत होतों. एवढ्या अवधींत पल्लवी बाहेरहि आली नाहीं.

इतक्यांत आंतून एक इसम बाहेर आला. पल्लवीला दरडावून त्यानं हांक मारली व ती बाहेर येतांच माझ्याकडे बोट दाखवून म्हणाला, "आणि हा कोण दुसरा ***?"

माझ्या शेजारच्या इसमानं तितक्याच जोरांत त्याला दरडावून शिवीगाळ न करण्याबद्दल सांगितलं. आणि कां कोण जाणे, वातावरण एकदम शांत झालं. तो इसम आंत गेला आणि कुठंतरी नाहींसा झाला. माझ्या शेजारचा इसमहि कांहींतरी स्वतःशींच पुटपुटत बाहेर निघून गेला.

पल्लवी माझ्याजवळ आली आणि म्हणाली, "तुम्ही आतां जा. आज जेवण झालंच नाहीं."

मी उठलों. दाराशीं ती मला हलक्या आवाजांत म्हणाली, "पुन्हां येऊं नका. हे तुमचे सगळे पैसे घ्या."

मी थोडा वेळ घुटमळलों...आणि चालूं लागलों.

संध्याकाळीं बस चुकली म्हणून मी पायींच घरीं जायला परतलों. येतां येतां रस्त्यापासून थोड्या बाजूला असलेलं आणि रोज पाहीन म्हणत असलेलं एक जुनं देऊळ होतं तिकडं सहज वळलों. अंधार पडायला अजून थोडा अवकाश होता. देवळावर मावळत्या उन्हाची जर फिरत होती. आजूबाजूला कुणीच दिसत नव्हतं. आंत जावं असं मला वाटेच ना. बाहेरचा देखावाच इतका चित्तवेधक होता कीं मी तिथंच पिंपळाच्या पारावर बसलों.

आंत चाहूल लागली म्हणून उठून पाहिलं.

पल्लवी. पल्लवीच होती ती. कुणीहि असली तरी पल्लवीच होती ती—खात्रीनं.

देवाला सांगण्यासारखं तिच्या मनांत कांहीं तरी खुपत होतं. आणि मी ? माझं मन अलिप्त राहूं शकत नव्हतं.

मावळत्या उन्हाचीं फुलं ओंजळींत घेऊन मी आंत ती बसली होती तिथं गेलों. तिच्या डोळ्यांतले दोन्ही मोर नाचत होते...

बाहेर उन्हाची जर विटली होती आणि अयाचित वारा पडला होता.

# दे ह स्वि नी

सेमेरिंगची उंची किती आहे हें आजहि मला माहीत नाहीं. इथं सारेच डोंगर उंच वाटतात—बर्फामुळं आणि मधूनच तरळणाऱ्या पिंजारलेल्या धुक्यामुळं. बस चढूं लागते तसतशी प्रतिक्षणाला एक वेगळीच सृष्टि दिसूं लागते. तींच झाडं, आणि तेच डोंगराचे कडे. पण प्रत्येक वळणाला एक वेगळाच न्यास साधून तीं आपणांपुढं टाकतात. आणि वळणं तरी किती 'आंकडेखोर' (hair-pin)! प्रत्येक वेळीं पुन्हा मागेंच गेल्याचा भास करून देणारीं.

मला गंमत वाटायची ती मुख्यत्वेंकरून भोंवतालच्या झाडांची. आजूबाजूच्या सृष्टीशीं आपला कांहींच संबंध नाहीं अशीच जणुं त्यांची वागणूक आणि जपणूक. प्रत्येकाचा नूर वेगळा.

आणि मग उगाच कांहीं तरी वेळ घालविण्यासाठीं मी बस-मधून बाहेर न पहातां आंतल्या लोकांकडे पाहूं लागलों. बाहेरच्या झाडांसारखींच मला तीं एकदम वाटलीं—वेगवेगळीं, स्वतःची अगदीं कसून जपणूक करणारीं. सारेच टूरिस्ट. कांहीं जर्मनींतले, बरेचसे इंग्लंडांतले, मी एकटा हिंदी, एक-दोघे फ्रेंच... आणि एक अमेरिकन बाई. बायाबायांत मी त्यावेळीं फरक करायला शिकलों नव्हतों. पण ही बाई मात्र इतरांहून वेगळी वाटण्याइतपत वेगळी होती. फारशी न बोलतांहि बोलकी, आणि कमालीची 'देहस्वी' (figure-conscious). तिची प्रत्येक हालचाल रेखीव,

टरवून केल्यासारखी होई; आणि तरीहि तिच्यांतील विमुक्तपणा जाणवल्याखेरीज रहात नसे.

बसमधला कंपनीचा वाटाड्या आपलें भाष्य इंग्लिश, फ्रेंच, आणि जर्मन भाषेंत आलटून पालटून करीतच होता. त्या डोंगराच्या कड्याला काय म्हणतात, ही दरी कोणती, पलिकडचा तो किल्ला कोणत्या ऑस्ट्रियन बादशहाच्या कारकीर्दींतला, तिथं कोणीं कोणाला कैदेंत ठेवलं होतं...इत्यादि. त्याची इंग्रजी बोलण्याची धाटणी बरीचशी अमेरिकन वळणाची वाटली. पुष्कळसे टूरिस्ट अमेरिकन असतात म्हणून कीं काय नकळे! त्यांतहि इंग्रजींतून सांगतांना तो बाकीच्यांना वगळून त्या अमेरिकन बाईलाच सारं कांहीं सांगितल्याचा आविर्भाव करी; आणि तीहि अगदीं एकाद्या लहान मुलासारखं सर्व लक्षपूर्वक ऐकून घेई—निदान तसं दाखवी. तिला दाखविण्यांत आलेलं हें जादा लक्ष तिच्या शेजारच्या आणि तिच्याहून थोड्या तरुण इंग्लिश बाईला फारसं आवडत नव्हतं. ‘देहस्विनी’नं (तिला आपण थोडा वेळ तसं म्हणूं.) तिला एकदांदोनदां कांहीं विचारलं त्याचं तिनं उत्तरच दिलं नाहीं... इतक्यांत बसमध्यें डाव्या बाजूला पाठीमागं बसलेल्या कांहीं उतारूंनीं एकदम ओरड ठोकली. जोरांत वळण घेऊन समोरून येणाऱ्या दुसऱ्या बसला ड्रायव्हरनं थोडक्यांत चुकविलं होतं. तसं करतांना मागचं एक चाक रस्त्याच्या कक्षेच्या बाहेर जाऊन निमिषमात्रच अंतराळांत लटकून परत रस्त्यावर टेकलं होतं. संकट मोठ्या नशिबानं टळलं होतं. वाटाड्यानं तेवढ्यांत बस खालीं पडली असती तर आम्ही किती फुटांवरून कोसळलों असतों याचं गणित सांगितलं.

बस मुक्कामावर आली आणि एका लहानशा हॉटेलपाशीं

थांबली. हॉटेलपाशींच एका कडेला एक पंधरासोळा वर्षांची मुलगी कांहीं विकायला उभी होती. पण तिच्याकडे त्यावेळीं लक्ष द्यायला कुणालाच फुरसत झाली नाहीं. झटपट उपाहार आटोपून सर्वजण गटागटानं निरनिराळ्या दिशेनं गेले. दोन तासांत बस परत निघणार म्हणून ड्रायव्हरनं पुन्हांपुन्हां बजावलं होतं. एका बाजूला चढण दिसली. मी एकटाच तिकडे वळलों. वाट संपली म्हणून वर थोडा वेळ बसलों, आणि थोड्या वेळानं खालीं उतरलों. दिलेली वेळ संपत आली होती.

बसपाशीं मीच पहिल्यानं पोंचलों असं मला कळून आलं. ती मुलगी अजून तिथंच उभी होती. मी तिकडे गेलों. महाश्वेतेचीं तीं फुलं होतीं. वरच्या डोंगर-कपारींतलीं. कधींहि न कोमेजणारीं. शाश्वत प्रेमाचं प्रतीक म्हणून या भागांत ओळखलीं जाणारीं. मी तीं पहिल्यानंच पहात होतों. त्या मुलीकडून मीं एक लहानशी डहाळी घेतली. तिला इंग्रजी येत नव्हतं, मला जर्मन फारसं समजत नव्हतं. दहा ग्रोशन (१०० ग्रोशन = १ मार्क) ती किंमत म्हणाली; पण मीं तिला ५० ग्रोशन दिले. हा सौदा चालू असतांनाच इतरांचाहि घोळका जमला. आणि मी जाऊं लागणार इतक्यांत त्या मुलीनं माझ्याकडे बोट दाखवून जोरजोरांत कांहीं सांगायला सुरुवात केली. सगळेजण माझ्याकडे पाहूं लागले. मला कांहींच बोध होईना. इतक्यांत 'देहस्विनी'हि कुठूनशी आली. तिच्या-बरोबर वाटाड्याहि होता. ती येतांच ती मुलगी तिला पुन्हा कांहीं सांगूं लागली. तिनंहि तिला आणखी कांहीं प्रश्न विचारले—अगदीं सफाईदार जर्मन भाषेंत. आणि मग माझ्याकडं वळून ती म्हणाली, "You must not rob a poor girl. She says, you didn't pay her." ("एखाद्या गरीब मुलीला असं लुबाडूं

नये. ती म्हणते, तुम्हीं तिला पैसेच दिले नाहींत.”) मी सर्दच झालों. मुकाट्यानं तिला आणखी एक दहा ग्रोशनचं नाणं काढून दिलं.

सर्वजण बसमध्यें चढले. ड्रायव्हरची घाई चालूच होती. पुरा काळोख पडायच्या आंत बस खालीं पोंचणं आवश्यक होतं.

कांहींनीं आतां जागा बदलल्या होत्या. वाटाड्या ‘ देहस्विनी ’च्या शेजारींच बसला होता. त्याच मार्गावर पुन्हा काय भाष्य करायचं म्हणून तो मोठ्यानं कांहींच सांगत नव्हता. खाजगी संभाषणाला अर्थात् कोणतीच आडकाठी नव्हती…

माझ्या खिशांतलीं तीं फुलं मात्र मला उगाच खुपत होतीं. तीं महाग पडलीं होतीं आणि तरीहि टाकून देववत नव्हतीं.

*Edelweiss=Noble White=*महाश्वेता

# सा वि त्री

सावित्रीची गोष्ट मला वाटतं मीं मागं एकदां सांगितली आहे. आज मला त्या गोष्टींत फारसं तथ्य वाटत नाहीं. खरोखरच ती सावित्रीची गोष्ट होती कीं काय याचीच मला भ्रांत पडते. त्या गोष्टीमुळं खुद्द सावित्रीची आठवण अधिकाधिक पुसट होत तर चालली नसेल अशीहि शंका मनांत डोकावून जाते.

ती गोष्ट...त्यावेळीं मीं काय लिहिलं होतं, हें सारं विसरून मला पुन्हां सावित्री पाहिली पाहिजे, समजून घेतली पाहिजे. अगदीं जवळून तिला न्याहाळलं पाहिजे; तिचं बोलणं, चालणं, वागणं...सारं कांहीं. मग हें असं करतांना जुन्या आठवणी हरवल्या तरी हरकत नाहीं. हरवतील तितक्या त्या बऱ्याच.

सावित्रीचं लग्न झालं आहे. कां तें तिचं तिलाच कळलं नसेल. आज जर तिला विचारलं तर ती तो विषय टाळील. एकामागून एक आपत्ती याव्यात, कशालाच कांहीं अर्थ उरूं नये आणि मग नको तेंच मुद्दाम नशिबाची परीक्षा पहाण्यासाठीं करून जावं तसं तिचं झालं असावं. हाहि एक प्रकारचा हट्टच. त्याला हट्ट म्हणायचं एवढंच; त्यांत अगतिकताच पुरेपूर असते.

मग सावित्रीचा संसार सुखाचा झाला आहे काय? मला वाटतं, हा असा प्रश्न कोणींच कोणाच्या बाबतींत विचारूं नये. त्यानं निष्कारण फाटे फुटतात. कुठंतरी कांहींतरी दुखावतं. मनाला पंख फुटतात. बंद पेट्यांचे अडसर आळसावत, अवघडत कुरकुरतात.

जोड्या जमतात, जुळतात आणि पुन्हां नाहींशा होतात. उगाच कुठंतरी बंडखोरीचे बावटे फडफडतात.

सावित्रीला मुलं आहेत. मुलांत ती रंगून गेली आहे. आज सगळ्यांनाच तसं रंगून जायला पाहिजे. मुलं, त्यांची शास्त्रोक्त जोपासना, शिक्षण, आजार, भांडणं, मार्ती, दगड आणि धोंडे. तिची मोठी मुलगी चांगली गाते. तिचं काय करायचं हा मोठा प्रश्नच आहे. गाणं शिकवलं तरी पंचाईत आणि न शिकवलं तरीहि. आणि तरीहि तिच्यासाठीं मास्तर आहे. तिला पदकं मिळालीं आहेत; आणि वर्तमानपत्रांनीं तिचे फोटो छापले आहेत.

सावित्रीचं—तिच्या नवऱ्याचं—एक घर आहे, भलंथोरलं; मोजून चवदा खोल्यांचं. इथून तिथं जायचं म्हटलं तरी धाप लागते. घराचंदेखील किती करावं लागतं! दुपारीं सावित्री एकटीच असते. तिच्या टेबलाच्या खणांत एक शिसवी आरशाची पेटी आहे. त्या पेटींत खूपशा कागदांच्या खालीं एका रेशमी रुमालांत कधीं-कधींची सुकलेलीं फुलं आहेत—चांफ्याचीं, बकुळीचीं, अबोलीचीं. आतां तीं मुद्दाम ओळखून आठवावीं लागतात. सावित्री लिहायला बसते. तिला पुष्कळ सांगायचं असतं. पण मग कांहींच न लिहितां ती तशीच खिडकींतून बाहेर पहात रहाते.

सावित्रीला नेहमींच खूप काम असतं. तिच्या नवऱ्याची एक संत्र्यांची बाग आहे, एकवीस गाईंचा गोठा आहे. चोहींकडून सर्वजण एकच गिल्ला करतात: "सावाका, हें कुठं आहे?", "सावाका, तें कुठं आहे?" सावित्री अगदीं थंड असते. ती सर्व कांहीं करते—सर्वांचं. तिच्या तोंडावर एक सतत बारिकसं हसूं असतं. ती फारशी बोलत नाहीं. तिच्या डोळ्यांचे पंख अगदीं संथ असतात.

मग एखादे दिवशीं दुपारीं ती आपल्या टेबलापाशीं बसते आणि लिहिते : "मी फार दमलें आहें. मला कांहींच नकोसं झालं आहे. इतकी दमलें आहें कीं वाटतं, डोळे मिटायचेहि श्रम न घेतां अवचित डोळे मिटले जावे. सगळं कांहीं तिथल्या तिथं थांबावं..." मी तिला कांहींच लिहीत नाहीं. "सावित्री, असं तूं म्हणूं नकोस. तूं माझी आहेस. मी येईन आणि सारं कांहीं ठीक होईल." मी नुसती माझीच समजूत घालतों. मलाहि वाटायला लागतं कीं मी फार दमलों आहें....फार, फार दमलों आहें.

सावित्रीच्या गोष्टीला इथून खरी सुरुवात होते.

# शेवट

शेवट अगदीं साधा असतो. आणि मग आपलंच आपणांला आश्चर्य वाटतं. ज्याची भीति सतत डांचत होती, जें टळावं म्हणून मनांतून परोपरीच्या प्रार्थना, आळवण्या आणि समाधानाचीं कोष्टकं मांडलीं होतीं—त्या साऱ्यांना कांहीं अर्थच उरत नाहीं. थोडंसं आपलं आपणांलाच हसूंहि येतं. दोन वाक्यांना आपण किती अर्थ लावला! उपनिषदांतील् सूत्रांचाहि इतका कुणीं कीस काढला नसेल. त्यांतल्या 'मनमोकळी' या शब्दाच्या किती छटा कोरल्या! मनमोकळी म्हणजे स्पष्ट अगदीं मनांतलं काय असेल तें मोकळेपणानं सांगून टाकणारी. मनमोकळी म्हणजे मुलखावेगळी—कोणीं केलं नाहीं तें आपणहून करणारी, दुसऱ्याला करायला लावणारी. मनमोकळी म्हणजे स्वच्छंदी, कुणाची पर्वा न करणारी, अगदीं गळ्यांत गळा टाकूनहि पुन्हां कांहींच झालं नाहीं असं दाखवणारी आणि इतकं करूनहि सहज नेहमींप्रमाणं वागणारी. मनमोकळी म्हणजे मनमोकळी—कोणत्याहि व्याख्येंत न गुरफटलेली. गुरफटून न जाणारी. मनमोकळी म्हणजे भोळी. खरंच!

मग आठवतं कीं आपण तिच्याबरोबर एकदां फिलहार्मोनिक कॉन्सर्टला गेलों होतों तेव्हां तिच्या श्वासाखेरीज दुसरं कांहींच ऐकूं येत नव्हतं. ती मात्र दूर कुठंतरी होती. डावा हात आपल्या दोन्ही हातांत घेऊन मध्येंच तिनं वट्टदिशीं किती झटक्यानं

दाबला! आणि तरीहि आपण भानावर आलों नाहीं. निरनिराळ्या वाद्यांचे सूर दूर कुठेंतरी मिळत होते, एकमेकांना चुकवीत होते, एकमेकांत अंतर राखूनहि सहज जवळिक करीत होते.

आपणांला कांहीं संगीत कधींच समजलं नाहीं. पण ती म्हणे, "न समजतांहि ऐकलं पाहिजे. संगीतालाहि आपण समजायला नको का?" प्रश्न असा उलटा फिरवला कीं सगळं जग कसं सोपं होतं! मग सगळं कांहीं आपण दुसऱ्यासाठीं करायला लागतों—प्रेमसुद्धां. कशाचंच कांहीं वाटेनासं होतं....

कधीं एकटेच अगदीं निपचित, कांहीं हालचाल न करतां आपण आपल्या खोलींत बिछान्यावर पडलेलों असतों. डोळे उघडे असतात पण कांहीं पहात नाहींत. हळूहळू सगळं कांहीं हल्कं वाटूं लागतं. मग आपल्याला कांहींहि साधतं. ती घरामागच्या बागेंत एका वडीच्या खुर्चीवर बसली आहे. मागं एक दगडी भिंत आहे. तिच्यावरल्या वेलाचीं पानं कशीं सर्व सलग मोजतां येतात! कोपऱ्यांत एक घडीचंच वाटोळं टेबल आहे. त्यावर एक पांढरा-शुभ्र अभ्रा आहे. टेबलावर आतां आणखी कांहींच नाहीं आहे. आपण म्हणतों, "चहा संपला आहे. सगळीं उपकरणीं आंत नेऊन ठेवून ती उगाच थोडा वेळ बसली आहे." आणि पुन्हां आपणच म्हणतों, "चहा वगैरे कांहीं नाहीं. ती नुसतीच बसली आहे. विसांवा म्हणून." ती कुठंहि पहात नाहीं—अगदीं आतां आपल्यासारखी. आणि मग आपणच आपल्याला पहातों आणि ती दिसली तशीच दिसेनाशी होते.

असं झालं कीं आपल्याला सारखं वाटतं कीं आपल्या हवं असण्यांत, बोलण्यांत, बघण्यांत अगदीं पुष्कळ शक्ति असावी. सगळ्या अंगोपांगांत, हालचालींत प्रसाद असावा. मग कुठंच उणं-

अधिक भासणार नाहीं—राहूंच शकणार नाहीं. आपण तिला लिहितों : "मी महिन्यानं इकडून जाणार आहें. कोण जाणे कधीं पुन्हा भेट होईल ती." बस, इतकंच. अधिक नाहीं. आणि खरोखरच एखादे दिवशीं आपण उतरलों असतों तिकडे ती येते आणि निरोप ठेवून जाते. तिच्यासाठीं जेव्हां आपण बाहेर पडतां तेव्हां तीहि पुन्हा आपल्याकडेच येत असते. वाटेंतल्या बागेंतच ती भेटते. आपण मुकाट्यानं तिच्याबरोबर जातों—ती उतरलेली असते त्या हॉटेलांत. तिच्या खोलींत ती वर जातां जातांच नोकराला कॉफी आणायला सांगते. आपण पाहतों : तिचं सामान बांधलेलं आहे; नोकराणी उशांचे अभ्रे व पलंगावरची चादर बदलीत आहे. कॉफी येते तेव्हां ती स्वतः कांहीं घेत नाहीं—आपल्यालाच देते. तिला आग्रहहि करावा लागत नाहीं. लगेच गाडीनं ती नदीपलिकडच्या शहरांत जाणार असते. नद्या किती सोयीनं वहातात !

जिन्यापर्यंत जेव्हां ती आपणांला पोंचवायला येते तेव्हां अगोदरच कितीतरी हलकं वाटायला लागलेलं असतं. कॉफी घेत असतांनाच मध्येंच तिनं तोंड पुढं करून दिलेल्या निर्भर मुक्याचीहि ओलव पुसट झालेली असते. खालच्या पायरीवर वळतांना आपण हात वर करतों. आणि मग आपलंच आपणांला आश्चर्य वाटतं....शेवट किती अगदीं साधा असतो !

# कादंबरी

तिला मी तिच्या नांवानं तशी कधींच हांक मारली नाहीं. मनांत मात्र म्हणायचों 'राज' आणि अगदीं त्याहूनहि मनांत 'ओ-हा' (=अस्सं!)—कारण तो खास तिचा शब्द होता. तिला हींच नांवं योग्य होतीं—तिच्या प्रचारांतल्या नांवापेक्षां.

ती हंसायची ती प्रथम डोळ्यांच्या कडांपासून. मग एकाला एक छेदित वर्तुळं उमटायचीं—थेट अगदीं आपल्यापर्यंत. स्वच्छ आणि लखलखीत.

पहिल्या वेळीं कांहीं ती अशी हंसली नाहीं. हंसलीच नाहीं. अगदीं गंभीर चेहरा करून बसली होती. मी एक गंभीर तर ती खात. माझं लक्ष होतं तिच्या ओठांकडे—त्यांना लपवणाऱ्या वाजवीहून थोड्या अधिक लाल रंगाकडे. खरं सांगायचं म्हणजे तिला त्याची जरुरी नव्हती. पण दुसऱ्या वेळीं मी हें मत बदललं. तिच्या एकंदर संभाराला तेंच शोभून दिसूं लागलं. कदाचित् तिनं ती लाली पहिल्यापेक्षां थोड्या माफक प्रमाणांत वापरली असावी. माझं लक्षहि आतां पहिल्यासारखं तिकडेच घुटमळत नव्हतं.

पहिल्या वेळीं मला आणखीहि कांहीं गोष्टी समजल्या नाहींत. त्यांतील मुख्य म्हणजे तिची संपूर्ण निरात्मता—objectivety स्वतः बोलतांना, दुसऱ्याचं ऐकतांना, मधल्या अपरिहार्य स्तब्धतेंतहि. इतक्या सहज ती असायची.

मी तिला माझी नुकतीच लिहून पुरी केलेली कादंबरी वाचायला

दिली होती—एक-दोघां जाणत्यांनीं सांगितलं म्हणून. (त्यांच्या भाषेंत एक मोठाळलेली गोष्टच.) तसं तिला साहित्यांत विशेष कांहीं समजतं म्हणून कुणी सांगितलं असतं तर खरंहि वाटलं नसतं. ज्यांनीं आधीं वाचली होती त्यांची तक्रार होती कांहींच समजलं नाहीं म्हणून! तिची तक्रार होती अगदीं पहिल्यापासूनच सगळं कांहीं समजतं म्हणून!

मी तिला दुसऱ्यांचं मत सांगितलं तेव्हां ती मघांशीं सांगितलं तसं पहिल्यांदा हंसली होती.

कादंबरी कशी हवी? मोठी, घसवशीत—अगदीं चार-पांच दिवस वाचूनहि सहज न संपणारी. तिच्यांत suspense हवा. वाचकाचं मन अडकवून ठेवण्याचं कसब हवं. माझ्या कादंबरींत तें कांहींच नव्हतं. एक साधी गोष्ट होती...पण तीहि नव्हती. मी तिला आकारच येऊं दिला नव्हता. सतत तेंच तेंच सांगत आवर्तांत पडलों होतों. हें होतं जाणत्याचं मत.

ती म्हणाली, तुम्ही या नांवाच्या फंदांत कशाला पडतां? या संदर्भांतील नेहमींची परिभाषाच तिला मंजूर नव्हती. तिचं म्हणणं: suspense म्हटलं कीं जणूं कुणाला तरी टांगल्यासारखं वाटतं. कबूल, कांहींतरी असायला पाहिजे—सतत तरळणारं, पण तेवढंच. मी या 'कांहीं तरी'ला गणितपद्धतीनं नांव दिलं $t$. आणि मग त्याचं रूप मांडूं लागलों $t_1, t_2, t_3 .. t_n$

पण हेंहि तिला मंजूर नव्हतं—असं मला नंतर दिसलं.

पुन्हां जेव्हां ती आली तेव्हां तिनं स्वतःच कांहीं लिहून आणलं होतं. मला त्यात जागोजाग माझ्याच कादंबरीचं प्रतिबिंब पडलेलं दिसून आलं. ती म्हणाली ही तुमचीच कादंबरी आहे म्हणून. दहा दिवसांनीं पुन्हां ऐकतां आहां म्हणून थोडी वेगळी

वाटते इतकंच. मोक्याच्या जागा त्याच तशा आहेत. थोडं मागचं पुढं आणि पुढचं मागं गेल्यासारखं वाटतं हें खरं. पण हें तसंच झालेलं नाहीं का ?

मी उगाच कांहीं तरी म्हणायचं म्हणून हो म्हणालों.

कादंबरींत तसं विशेष कांहीं नव्हतं. पात्रं चार आणि चौघांच्या चार तऱ्हा. एक नटी—भामिनी, वसंतसेनेच्या अगदीं उलट, पण ती भूमिका करणारी; दुसरा डायरेक्टर—जयशंकर (म्हणतांना तो स्वतःला जे० शंखार म्हणायचा); तिसरा दत्ता (हा पुढं चारुदत्तच ठरतो.) आणि चौथा दाणी, रेल्वे गार्ड. पहिल्या भागांत सिनेमातलं शूटिंग आणि थोडं जास्त शाब्दिक शूटिंग. दुसऱ्या भागांत आगगाडींत काय घडलं त्याची हकीगत, जयशंकरचं कारस्थान आणि दत्ताची, त्याची व दाणीची डब्यांतील झटापट. तिसऱ्या भागांत भामिनीच्या बंगल्यावरील बोलाचाली. दत्ताचं काय झालं तें शेवटीं कळतच नाहीं. भामिनी त्याला 'ठेवून' घेते आहे म्हणावं तर जयशंकर तिथं पहिल्यासारखाच आहे—मस्तावलेला आणि दिवाणखान्यांतील दिवाणवर सुस्तावलेला.

कादंबरींत मला खरोखर रंगवायचं होतं दाणीचं पात्र. त्याच्या लहानसहान खोडी, कामाविषयींची आस्था, स्वप्नांत कुणी त्याच्याजवळ येत असे म्हणून तो सर्वांना सांगायची ती गोष्ट, लाइनवरील त्याचा वचक, ओळखी, इत्यादि. पण दत्तानं त्याला अक्षरशः खाऊन टाकलं. पुढं तो टिकूंच शकला नाहीं. खऱ्या मृच्छकटिकांतल्याप्रमाणं एखादं खटल्याचं प्रकरण घालून त्याची साक्ष काढतां आली असती. जयशंकरचा तो भाऊच—निदान मावसभाऊ म्हणून तरी—खास दाखवितां आला असता. डब्यांतील झटापटीच्या दुसऱ्याच दिवशीं तो सेवानिवृत्त होतो असं

दाखवून त्याला जयशंकरच्या—कीं भामिनीच्या ?—बंगल्यावर यायला लावतां आलं असतं. जाणत्यांची अपेक्षा ही किंवा अशीच थोडीशी होती. प्रत्यक्ष कादंबरींत ड्यूटी संपल्यावर तो जातो तो कांहीं पुन्हां येत नाहीं.

राज मला नंतर म्हणाली, या कादंबरीचं नाटक करायला हवं, स्टाइनबेक करतो तसं. लिहायचंच असं कीं अवतरणं काढून नुसते डॅश दिले कीं झालं नाटक.

तेंहि करून पाहिलं पाहिजे.

## रुखमण

खरं सांगायचं म्हणजे मला त्यावेळीं बदली नको होती. पण आंध्र वेगळा करायचा ठरल्यावर माझ्यासारख्या कन्नड अधिकाऱ्याला मद्रासहून कुर्नूलला पाठवलं तर त्याबद्दल फारसं कांहीं करतां येण्यासारखं नव्हतं. मी आलों तेव्हां जागेची टंचाई सर्वत्रच होती. पण माझ्या सुदैवानं मला एक वेगळाच आणि स्वतंत्र, लहानसा बंगला मिळाला. वास्तविक तो एखाद्या दुय्यम मंत्र्यानंच पटकावायचा, पण मिळाला माझ्यासारख्या 'बाहेरच्या' ऑफिशिएटिंग सेक्रेटरीला. बंगला होता गांवाच्या एका कडेला. जवळपास रहातीं घरं नव्हतींच असं म्हटलं तरी चालेल. समोर थोड्या अंतरावर एक जुनी धर्मशाळा होती तेवढीच. धर्मशाळेचं पहिलं स्वरूप जाऊन तिचं मार्केटांत केव्हां रूपांतर झालं तें कळायला कांहीं मार्ग नव्हता. मी माझ्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणं डायरींत नोंद केली; हें मार्केट केव्हां सुरू झालं तें रेव्हिन्यूखात्याला विचारायचं. ओट्यावर, आंत, बाहेर लहानमोठीं चिल्लर दुकानं; कोपऱ्यावर एक कॉफीचा अड्डा आणि नेहमींच अंवतीभंवती गर्दी. बाजूच्या देखाव्यांत हें मार्केटाचं मोहोळ नीटसं बसत नव्हतं. पण माझ्यासारख्या एकट्या माणसाला तेवढाच विरंगुळा.

कोंडाप्पा, माझा पट्टेवाला, घरचं बहुतेक काम करी—झाडलोट, जेवण आणणं वगैरे. तो होता कुर्नूलचा. तेव्हां रात्रीं घरीं जाई. पहिल्यापहिल्यांदा ऑफिसचं काम बरंच असे. इकडेतिकडे लक्ष

घ्यायला फुरसतच नव्हती. रविवारची सुट्टीही क्वचितच मिळायची. पण हळूहळू कामाला शिस्त लागली आणि मी आजूबाजूला पाहूं लागलों.

तो दिवस होता शनिवारचा. संध्याकाळचे पाच-साडेपाच झाले असतील. मीं बंगल्याच्या आवारांतच आरामखुर्ची टाकून नवीन मागवलेलीं पुस्तकं चाळीत बसलों होतों. मार्केटाकडे नेहमींच संथ वर्दळ चालू होती. पण मधेंच आवाज थोडे चढले असं वाटलं. एकदां उठून काय चाललं आहे तें पाहून यावं असंहि वाटलं, पण वाचतांना तो विचार तसाच बारगळला.

दोनतीन मिनिटांनीं मला उठावंच लागलं. सगळी गर्दीच बंगल्याच्या आवारापाशीं येऊन ठेपली, आणि रडतओरडत एक तरुण पोरगी मी उभा होतों तिथें येऊन माझ्या पायालाच बिलगली. तिच्यामागं एक म्हातारी होती. सगळेच ओरडत होते. एकमेकांशीं वाद घालीत होते. मी त्यांच्याहि वर आवाज चढवून सगळ्यांना निघून जायला सांगितलं. इतक्या मोठ्यानं आपल्यालाहि ओरडायला येतं याचं मलाहि त्यावेळीं थोडं कौतुक वाटलं. माझ्या त्या आविर्भावानं जमाव एकदम शांत झाला. पण त्यांचे पाय हालेनात. पुढं काय होणार तें त्यांना पहायचं होतं. मी पुन्हां आवाज चढवून सर्वांना चालतं व्हायला सांगितलं—म्हातारीलाहि. पोरीला सांगितलं, आंत—बंगल्यांत हो. म्हातारी ऐकणार नाहीं असं मला वाटलं होतं. पण काय झालं कुणास ठाऊक! पोरीला हजार शिव्या देत ती परतली. तिच्या मागं बाकीचेहि गेले. दोघेतिघे रेंगाळण्याचा प्रयत्न करीत होते. पण मी कांहींच झालं नाहीं अशा आविर्भावांत खुर्चीवर बसून पुन्हां वाचीत राहिलों तेव्हां तेहि निघून गेले.

पंधराएक मिनिटांनीं ती पोरगी दवतदवत बाहेर आली आणि थोडी दूर उभी राहिली. मी मुद्दामच तिच्याकडे पाहिलं नाहीं— आणि मग पाहिलं. पाहिलं आणि लगेच स्वतःला सांवरून पुन्हा निर्विकार झालों.

थोड्या वेळानं म्हणालों, "तूं जात कां नाहींस ?"

ती बोललीच नाहीं. मीहि पुन्हां वाचूं लागलों.

मग आपण होऊन ती म्हणाली, "मला भूक लागली आहे. म्हातारीनं कालपासून खायलाच घातलं नाहीं."

मी उठलों आणि तिला आंत बोलावलं. दुपारचा डबा तसाच पडला होता. तिला तो दाखवला आणि सांगितलं, "यातलं हवं तें खा."

एकदां वाटलं, तिकडेच थांबावं. जातांना एखाद भांडं नेलं तर काय घ्या ! पण मग वाटलं, असा अविश्वास दाखवणं बरं नाहीं. ज्या बुभुक्षेनं ती अन्नावर तुटून पडली तीहि मला फार वेळ पहावली नसती.

मी बाहेर जाऊन बसलों. अर्धापाऊण तास झाला तरी ती बाहेर येईना म्हणून थोडा काळजींतच होतों. शेवटीं आंत उठून गेलों. तिनं खाऊन भांडीं घासून लखलख करून ठेवलीं होतीं आणि झाडलोट करायला लागली होती.

मी तिला म्हटलं, "हें कशाला ! तूं जा आतां. माझा नोकर येईल." ती पहिल्यासारखी कांहीं बोललीच नाहीं. किंचित् थांबली. पण काम मात्र तसंच चालू ठेवलं.

मी विचारलं, "नांव काय तुझं ?"

"रुखमण." ती म्हणाली.

"आणि ती म्हातारी ?"

"ती माझी आई—पण सासूसारखी सदा मला मारते."

"तूं काय करतेस ?"

"मिळेल तें काम. मी आतां इकडेच येईन."

मला तिची धिटाई आवडली आणि उगाच भीतीहि वाटली.

काळोख पडायला लागला होता म्हणून माझीं बाहेरचीं पुस्तकं आवरून आंत व्हरांड्यांत टेबलावर ठेवलीं. उघडमिटीची आराम-खुर्ची रुखमणच घेऊन आली. खुर्ची तिनं नीट पुन्हां उघडून ठेवली. तिला हें काम माहीत होतं असं दिसलं.

कोंडाप्पाला नेमका आजच उशीर झाला होता. तो ह्यानंतर येऊन मग रात्रीचं जेवण आणणार होता.

इतक्यांत दारावर थाप पडली. कोंडाप्पाच असेल म्हणून मीच पुढं झालों. दार उघडलं तों एक कुणी नवखाच.

"रुखमणला मी न्यायला आलों आहें." तो म्हणाला. दिसायला होता धिप्पाड—थोडासा भयंकरच. पण आवाजावरून अगदींच मेंगळा वाटला.

"तूं कोण ?" मी विचारलं.

"मी भाऊ तिचा." तो म्हणाला.

"पुन्हां मायलेक तिला बद्डणार आहां काय ?"

"तुम्हांला तिची माहिती नाहीं." तो म्हणाला. "तुम्हीं सांभाळून घेणार असलां तर इकडेच ठेवा. मी तर बेकारच आहें."

"माझ्याकडे कांहीं काम नाहीं." मी म्हणालों.

इतक्यांत आंतून कांहीं फुटल्याचा आवाज आला. मी आंतल्या खोलींत गेलों. रुखमणनं टेबललॅंप चादर झटकतांना फोडला होता. तिला फारसं कांहीं वाईट वाटलेलं दिसलं नाहीं.

ती हलक्या आवाजांत म्हणाली, "मी मुद्दामच हा फोडला तुम्हांला बोलवायला. त्याला सांगा, मी राहीन. रोजचा पगार रुपया देईन."

"रोजचा पगार?" कांहींच समजलं नाहीं म्हणून मी विचारलं.

"हो रोजचा! त्याला द्यायलाच पाहिजे. जा सांगा—माझ्या-साठीं." मी मुकाट्यान बाहेर गेलों आणि त्याला म्हटलं, "ती नीट काम करील ना?"

"तिला संवय आहे. तिचं घरींच पटत नाहीं."

"हा रुपया. आजचा पगार."

मी त्याच्या हातावर पैसे ठेवतां, इतक्यांत रुखमणच बाहेर आली. आणि त्याच्या हातावर हात मारुन तो रुपया तिनं काढून घेतला.

"हा पहिला माझा आहे. उद्यांपासून त्याला द्या."

ती उतरली आणि त्याच्याबरोबर चालूं लागली.

मी मनांत म्हटलं, "रुपयावरच भागलं!" आणि मग एकदम आठवलं, "फुटलेल्या टेबललँपवर." ती तशीच गेली होती. त्या दिवशीं कोंडाप्पाहि आला नाहीं.

खोलींतल्या कांचा मीच आवरल्या. खायला कांहींतरी हवंच होतं, तेव्हां एक ऑमलेट बनवलं अन् वेळ मारुन नेली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी उठायच्याच आधीं ती आली. कडी लावलेलं दार उघडून ती आंत कशी आली तें मला कळलंच नाहीं.

कॉफी तिनं तयार केली होती.

टेबलावर ठेवतांना मला म्हणाली, "मी इथं कामाला आहें म्हणून कोंडाप्पाला सांगून आलें. तुमची फुटलेल्या दिव्याची

कांचहि आणली आहे. तुम्ही कांचा उगाच काढल्यात. मी सकाळीं आल्यावर काढल्या असत्या."

त्यानंतर घरचीं सर्व कामं ती विनबोभाट करी. क्वचितच बोलायची. तिचा भाऊ नियमानं संध्याकाळीं एक रुपया वसूल करायला यायचा. त्याच्या मागोमाग काम उरकून तीहि जायची. कोंडाप्पानंहि कांहीं तक्रार केली नाहीं. तसा त्याला माझा बंगला लांबच पडायचा.

या एकंदर प्रकाराची मला लवकरच इतकी संवय झाली कीं त्यांत कांहीं विचित्र आहे असं वाटेच ना—आंध्रनिर्मितीच्या पहिल्या वाढदिवसापर्यंत.

त्या दिवशीं सचिवालयांत पार्टी होती. रात्रीं यायला बारा वाजले. त्यापूर्वी मला कदाचित् जर उशीरच झाला तर रुखमण वेळेच्या पलिकडे थांबत नसे. कुलूप लावून जाई. मी तिच्याकडे एक वेगळी किल्लीच दिली होती. रात्रीं बाहेरचं दार ढकलल्यावरच उघडलं. आंतल्या दोन्ही खोल्यांत दिवे होते. मी प्रथम स्वयंपाकघरांत गेलों. तिकडे कांहीं ती नव्हती. तिकडून झोपायच्या खोलींत गेलों. दिवा तसाच उघडा ठेऊन माझ्या पलंगावर ती गाढ झोंपून पडली होती.

"रुखमण—" मी थोडी मोठ्यानंच हांक मारली. पण ती कांहीं जागी झाली नाहीं.

मी गांगरलों—पण थोडाच वेळ.

कपडे उतरून व्हरांड्यांतल्या दिवाणवर जाऊन झोपलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तिनं नेहमींसारखींच कामं केलीं. रात्रीच्या घटनेबद्दल मी तिला विचारलं नाहीं. तिनंही चकार शब्द काढला नाहीं.

आठवड्यांतच मला कुर्नूलहून पुन्हां मद्रासला जावं लागलं. सरकारी यंत्रणेंतील कांहीं चाकं अचानक फिरलीं होतीं.

गोष्ट अशी ही एवढीच—इथंच संपायला हवी. पण मागाहून मला एकदोन गोष्टी समजल्या त्याहि सांगायला हव्यात.

माझ्यामागून त्या बंगल्यांत सुब्रह्मण्यम्—माझाच एक जुना मित्र आणि सहकारी—रहायला आला होता. रहायला गेल्या-नंतर चारपांच दिवसांतच त्यानं मला पत्रांत लिहिलं.

"गेल्या शनिवारीं संध्याकाळीं मी बंगल्याच्या आवारांत वाचीत बसलों होतों. इतक्यांत समोरच्या मार्केटांतून एक लोकांचा घोळका आला. एक म्हातारी एका पोरीला मारीत होती. पोरगी थेट माझ्यापाशीं आली. मी सगळ्यांना हांकलून काढलं. ही पोरगी आतां माझ्याकडेच कामाला आहे. ती म्हातारी तिची सासू आणि पैसे न्यायला येतो तो तिचा नवरा. ही माहिती मी स्वतः काढली. पोरीनं पुष्कळच कांहीं थापा दिल्या होत्या. कांहीं असलं तरी पोरगी मोठी स्पोर्ट आहे. पैसे थोडे जादा द्यावे लागतात. पण मी तरी इतके घेऊन काय करणार आहे! गरिबी मला पहावत नाहीं. you know!" इत्यादि...

डायरींत मी त्या दिवशीं लिहिलं :

"माझं कुठं चुकलं का?"

आणि त्याचं उत्तर :

"मला नाहीं वाटत. तिनं माझ्यावर विश्वास टाकला. विश्वासाला मी विश्वास दिला. बाकीचं जग चुकत असतं. आपण नाहीं."

आणि लगेच खालीं ओळ मारून लिहिलं.

"Pompous Ass."

# विपर्ययः स्त्रीपूर्वकः

गेलीं कित्येक वर्षे अवर्षणाचें नांवहि नव्हतें. सर्वत्र सुखसमाधानाची छाया होती. नगरांत आणि आसमंतांतील महापथांवर ठिकठिकाणीं पक्का बंदोबस्त होता. कोणत्याहि प्रकारें चोर आणि भिक्षू यांचा उपद्रव होणें संभवत नव्हतें. आणि म्हणूनच व्यापारासाठीं गेलेला सोमदत्त जेव्हां सर्वस्व गमावून एकटाच वैशालीला परत आला, तेव्हां सर्वांनाच या घटनेचें आश्चर्य वाटलें.

सहाजिकच वैशालींत निरनिराळे तर्क सुरू झाले. द्यूतामध्यें त्यानें सर्वस्व गमावलें असेल असें कांहींचें म्हणणें पडलें. मद्याच्या धुंदींत त्याला कोणीतरी लुबाडलें असेल असेंहि सांगणारे कांहींजण निघाले. द्यूत तो कधींमधीं खेळत असे. सर्वसाधारण गृहस्थधर्माला अनुसरून प्रसंगविशेषीं मद्यहि प्राशन करीत असे. परंतु द्यूत किंवा मद्य यांच्या आहारीं जाऊन त्याचे हातून अनुचित वर्तन होईल हें संभवत नव्हतें. त्याच्या एकंदर स्वभावांत आणि वागणुकींत जी शुचिता आणि जो संयम होता त्याच्याशीं हें अगदींच विसंगत झालें असतें. “विपर्ययः स्त्रीपूर्वकः”* असें जें म्हटलें आहे तेंच खरें असावें, असा यांतून अभिप्राय काढण्याचा सर्वांनाच मोह होऊं लागला.

* याचाच फ्रेंच पर्याय :
Cherchez la Femme = (कांहीं घोटाळा असला कीं आधीं) स्त्रीला शोधून काढा.

सोमदत्ताला प्रियमण्डना नांवाची सुस्वरूप आणि सद्गुणी स्त्री पत्नी म्हणून लाभली होती; तेव्हां तो अशा प्रकारच्या मोहाला बळी पडला असण्याचा संभव नाहीं असें पुष्कळांचें म्हणणें पडलें. परंतु स्त्रीविषयक मोहाचें अशा रीतीनें स्हगृहिणीच्या रूपगुणादि विशेषांशीं निश्चित गणित मांडतां येत नाहीं आणि एखाद्याच्या पूर्वस्वभावावरून त्याच्या वागणुकीचा आगाऊ आलेखहि काढतां येत नाहीं, असाच जाणत्यांचा अभिप्राय पडला.

सोमदत्ताला यासंबंधांत कोणींच विचारलें नाहीं. विचारलें तर त्यानें कितपत सांगितलें असतें हाहि प्रश्नच होता. त्याचे मित्र म्हणविणारे त्याला आतां टाळूं लागले होते. इतरांना त्याच्या भवितव्याची फारशी पर्वा नव्हती. त्याच्या वागणुकींत मात्र कोणतेंच अंतर पडलें नाहीं. पूर्वीसारखाच मन लावून तो व्यापार करूं लागला. आपलें दैन्य त्यानें लपविलें नाहीं किंवा मुद्दाम दाखविण्याचाहि प्रयत्न केला नाहीं. स्वजनांना त्यानें दुखावलें नाहीं. उलट, त्याची सर्वच वागणूक अधिक समंजस झाली होती. दोन वर्षांत तो पुन्हां प्रतिष्ठित व्यापारी म्हणून ओळखला जाऊं लागला. त्याचे पांगलेले मित्रही जुन्या ओळखी काढून पुन्हां त्याच्याभोंवतीं घोटाळूं लागले.

सोमदत्तांत या अवधींत अगदींच फरक पडला नव्हता असें नाहीं. त्याच्या वृत्तींत एक प्रकारचा अभावित आनंदीपणा जाणवूं लागला होता. पूर्वी त्याला न आवडणाऱ्या गोष्टीहि तो आतां उत्साहानें करूं लागला होता. क्वचित् त्याचें मन भोंवतालच्या परिवारांत नाहीं असें एखाद्याच्या विचक्षण दृष्टीला वाटलें तरी तें खरें नाहीं असें वाटण्याला लावण्याइतकी सहजता त्याच्या एकंदर बोलण्या-चालण्यांत लगेच दिसून येत असे.

आणखी दोन वर्षें अशींच गेलीं. व्यापारांतील नेहमींच्या चक्रनेमिक्रमाला अनुसरून सोमदत्तावरील पूर्वींच्या आपत्तीचें सर्वांनाच विस्मरण पडलें. सोमदत्त स्वतः जागरूक होता किंवा कसें हें मात्र कळावयाला कोणताच मार्ग नव्हता. अत्यंत कुशलतेनें त्यानें आपला धनोपार्जनाचा व्यवसाय चालविला होता एवढें मात्र खरें.

आणि मग एके दिवशीं अचानक त्यानें आपल्या परिवारांतील सर्वांना एकत्र बोलावून आपला पुन्हां देशपर्यटणाला जाण्याचा मानस व्यक्त केला. जमल्यास व्यापार करावयाचा, परंतु बरोबर केवळ प्रवासाला उपयोगी पडेल एवढेंच द्रव्य घ्यावयाचें त्यानें ठरविलें होतें. आपल्या धंद्याची व एकंदर मालमत्तेची त्यानें श्रेष्ठींच्या सल्ल्याप्रमाणें नीट व्यवस्था लावून दिली आणि सुमुहूर्त पाहून प्रयाण करण्याचें योजिलें.

सर्व निरवानिरव केल्यानंतर निघण्याच्या आदल्या रात्रीं तो आपल्या पत्नीला म्हणाला, "प्रियमण्डने, माझा विचार तुला पसंत आहे ना?"

ती म्हणाली, "हा प्रश्न तुम्ही मला विचारायला नको होता. तुमचे आचार, विचार आणि उक्ती यांच्याशीं मी आजवर समरस होण्याचा प्रयत्न केला आहे. तुम्ही जें जें कांहीं कराल, तें तें चांगल्याचसाठीं कराल अशी माझी खात्री आहे."

"हें तूं पत्नीधर्माला साजेसेंच बोललीस," तो लगेच म्हणाला, "पण तुला कधीं असें वाटलेंच नाहीं का, कीं आहे तें सगळें सोडून ज्याची ओळख कधींच पटली नाहीं त्या दैवाचा शोध घ्यावा?"

"हाहि प्रश्न तुम्हीं मला विचारायला नको होता. दैवाचा

शोध घेऊन तें मिळूं शकेल असें मला वाटत नाहीं. मी त्याचा शोध घ्यायला कुठें गेलें आहे? पण त्यानें मला टाळलें आहे का?"

प्रियमण्डनेचें हें बोलणें ऐकून सोमदत्त प्रथम थोडा स्तिमित झाला; पण मग सांवरून म्हणाला, "चार वर्षांपूर्वी जेव्हां मी सर्व धन गमावून परत आलों तेव्हां तूं मला एका शब्दानेंहि काय झालें त्याबद्दल विचारलें नाहींस!"

"तुम्हीं परत आलांत, यांतच मला सगळें कांहीं मिळालें होतें." प्रियमण्डना म्हणाली, "धन तुम्ही केव्हांही मिळवूं शकाल हें मी जाणून होतें."

"हेंहि तुझें बोलणें तुला साजेसेंच झालें," सोमदत्त पुढें म्हणाला, "आजपर्यंत मी जें कुणालाहि सांगितलें नाहीं तें तुला सांगतों. ध्यान देऊन ऐक...

"शूर्पारकाहून परत येतांना आतां वैशाली जवळ आली आहे तेव्हां स्वतःच्या मर्जीप्रमाणें थोडी परिक्रमा करावी या हेतूनें मी इतरांपासून मागें राहिलों. वाटेंत एकदां एके ठिकाणीं एका लहानशा नगरांतील धर्मशाळेंत उतरलों होतों. तिथें संध्याकाळच्या सुमाराला मला पाहून एक पोक्त बाई जवळ आली आणि माझी चौकशी करून म्हणाली, 'तुमच्या पोशाखावरून तुम्ही कोणी भले व्यापारी दिसतां. इकडे एकीकडे उतरण्याऐवजीं गांवांत आमच्या घरीं कां येत नाहीं? घरीं मी आणि माझी सून आहे. माझा मुलगा असाच तुमच्यासारखा परदेशाला गेला आहे. तुम्हांला पाहून मला प्रथम त्याचीच आठवण झाली.

"बाई इतक्या आग्रहानें बोलावीत आहे हें पाहून मी तिच्या बरोबर तिच्या घरीं जायला निघालों.

घर चांगलें प्रशस्त दिसलें. त्या बाईनेंच माझें आगतस्वागत केलें. तिची सून किंवा इतर कोणीच दिसलें नाहीं. रात्रीं भोजनोत्तर तिच्याशीं कांहीं वेळ बोलून मी मला दिलेल्या खोलींत गेलों आणि शय्येवर पडलों. तिच्या साध्या आणि निष्कपट वागण्याचा विचार करीतच झोंपीं गेलों.

"मला कांहीं वेळ तरी चांगलीच झोंप लागली असावी. जेव्हां मला जाग आली तेव्हां माझ्या शेजारीं कुणीतरी आहे याची मला समज पटली.

"...तुला हें सांगायला हरकत नाही." सोमदत्त थोडें थांबून प्रियमण्डनेला म्हणाला, "तीच होती ती. तिच्या साऱ्या अंगांनीं तिनेंच सांगितलें. किती वेळ तरी मी केवळ तिचा होतों. मला कोणताच विचार करायला तिनें अवसर दिला नाहीं. आणि... सांगूं? मला त्यांत कांहीं वावगें आहे असें वाटलेंहि नाहीं."

प्रियमण्डना हें नुसतें ऐकत होती. तिच्या मनांतलें कोणाला कसें कळणार होतें?

सोमदत्त, जणुं आपण एकाद्या त्रयस्थाशींच बोलतों आहों या भोळ्या आविर्भावांत तिला सर्व सांगण्याचा प्रयत्न करीत, पुढें म्हणाला, "थोड्या वेळानें ती उठून गेली. मला जाग आली, तेव्हां सकाळ केव्हांच टळून गेली होती. मी घाईनें उठलों. मला पुढचे बेत ठरवायचे होते.

"ती जेव्हां पुन्हां दिसली तेव्हां आदल्या दिवसाहून कांहीं वेगळी भासली नाहीं. तोच सात्त्विक भाव, तीच मर्यादा. फक्त मला म्हणाली, 'तुम्हीं जाण्याची घाई कां करतां?' मी म्हणालों, 'जायला पाहिजे.' आणि मग अचानक बोलून गेलों, 'पण आजच नाहीं जात. जाईन उद्यांपरवा.'

“रहायचेंच तर गांव पहावा म्हणून थोड्या वेळानें एकटाच मी फिरायला निघालों आणि मग एकाएकीं काय वाटलें कुणाला ठाऊक. पुन्हां तिच्या वरीं न जातां गांव मागें टाकून वैशालीकडे वळलों. सारी चीजवस्तू तिच्याकडेच राहिली.”

एवढें सांगून झाल्यावर सोमदत्त थांबला. प्रियमण्डना कांहीं बोलेल असें त्याला वाटलें होतें—तिनें बोलूं नये असेंहि त्याला वाटत होतें.

थोड्या वेळानें प्रियमण्डना म्हणाली, “किती तुम्हांला साजेल अशी ही गोष्ट आहे! पण तुम्ही त्या बाईला अन्याय केला. धनलोभानें कांहीं ती तुमच्याजवळ आलेली नव्हती. तुम्हीं परत आलां नाहीं हें पाहून तिला काय वाटलें असेल?”

“मी उद्यां तिच्याकडेच जायला निघणार होतों असें तर नाहीं ना वाटलें तुला?” सोमदत्त प्रियमण्डनेची अनपेक्षित प्रतिक्रिया पाहून घाईनें म्हणाला.

“नाहीं. पण तुम्ही जायला पाहिजे असेंहि नाहीं. त्यानें कांहीं साधणार नाहीं. गेलेलें पुन्हां येणार नाहीं. तुमच्या मनाला जें कांहीं जाणवलें त्याची तीव्रता मात्र कमी होईल. दैव एकदांच भेट देतें.” प्रियमण्डना त्याच्याकडे निःशंक पहात म्हणाली.

सोमदत्त तिचा हात हातांत घेत म्हणाला, “हो, दैव एकदांच भेटतें.”

सोमदत्त नंतर दुसऱ्या दिवशीं प्रवासाला गेला किंवा नाहीं हें नमूद नाहीं.

# दक्षा

दक्षाच्या शेवटच्या भेटीला सोळा वर्षं झालीं होतीं, पत्रव्यवहार थांबल्याला दहा वर्षं, आणि तिला जवळजवळ विसरल्यागत झालेल्याला—? पण उगाच हा हिशेब करण्यांत अर्थ नव्हता. तिचं एक तुटक पत्र आलं होतं आणि लगेच दोन दिवसांनीं ऑफिसमध्यें तांतडीचा फोन.

पत्रांतलं अक्षर ओळखीचं होतं—दीर्घ मुदतीमुळं, कदाचित् तिला आतां पूर्वींसारखा लिहिण्याचा सराव नसल्यामुळं, थोडं 'बिघडलेलं', जुन्याचा अनुकार कटाक्षानं करण्याइतकं त्राण नसलेलं. पत्ता दिला होता भायखळ्याच्या एका हॉटेलचा—जो मला खरो-खरच शोधून काढावा लागणार होता. आणि मजकूर ? कांहीं नाहीं. मी इथं आलें आहें. दोन किंवा तीन दिवस आहें.

पहिल्यांदा मी मुद्दामच मन घट्ट करून घेतलं—मागचं सगळं बाजूला सारून, आतांचं सगळं तपशिलवार स्वतःलाच पढवून देत. इतकीं वर्षं कोण कुणाचा राहिलेला असतो ?

मला आठवलं, दक्षा अशीच उभी असायची आपल्या मामाच्या घराच्या खिडकींत. मी माझ्या खोलीच्या खिडकीशीं बसलेला पुस्तकांतील अक्षरांची संवय करीत. तिची मुद्रा असायची निर्विकार, जणुं आपण कांहींच पहात नाहीं अशी. मी तर तिला दिसतच नव्हतों—अगदीं समोर शेजारच्या घरांत खालच्या मजल्यावर पंचेचाळीस अंश कोन करणाऱ्या भुजाच्या दुसऱ्या

टोंकाला अस्वस्थ बसलेला. बॅबिंग्टन-स्मिथ कमिटीच्या सर्व चलन-विषयक सूचना माझ्या समोरच्या पुस्तकांत दक्षाच्या नांवानं चित्रित झाल्या असायच्या...भारतीय अर्थशास्त्र मी माझ्यापुरतं तेव्हां असं सोपं करून टाकीत असें.

ही दक्षा कधीं घरांतून बाहेर पडायची नाहीं. पहिले पांचसहा महिने तरी मी तिला आजूबाजूला कुठंच पाहिलं नाहीं.

पुष्कळ वाचून मग नंतर पुष्कळ फिरायचं असा माझा तेव्हां एक नियम असे. पिसाटासारखा एकटाच सॅंढर्स्ट रोड, ह्यूज रोड, गिब्ज रोड या वाटेनं हॅंगिंग गार्डनवर जाऊन न थांबतां सहा प्रदक्षिणा घालायचों आणि शिरी रोडनं तितक्याच वेगानं धांवत येऊन पुन्हां रात्रीं जेवून अभ्यासाला बसायचों. असेच कांहीं दिवस गेले...भारतीय चलनशास्त्राच्या इतिहासांत झपाट्यानं बदल होत होता. सरकार केवळ माझ्यासाठींच नवनवीन कमिट्या नेमीत होतं.

याच सुमाराला अचानक माझं खिडकीयुग संपलं. दक्षाची कधीं-तरी, कुठंतरी प्रत्यक्ष ओळख झाली. तिला मी माझ्या कविता वाचायला देऊं लागलों. तीहि त्या वाचून त्यांच्याबद्दल एक अक्ष-रहि न बोलतां नियमित दोन दिवसांनीं त्या मला परत आणून देऊं लागली. एका कवितेचं नांव होतं, 'वीणा-गीत'. मी ती कविता ग्रीक वीणेची आकृति काढून एकेक ओळ एकेका तारेच्या जागीं लावून दिली होती. हा वीणा-बंध म्हटला तर अगदीं जुन्यांत जुना होता. दक्षानं हें गीत वाचून परत करतांना त्यांतील वीणेची बाह्य आकृती अधिक सुबक करून दिली. कशिद्यासाठीं हें नवं डिझाईन आपण कॉपी करून ठेवलं आहे असंहि सांगितलं.

त्यानंतर दोनतीन दिवस भारतीय अर्थशास्त्रावर मी अधिक परिश्रम घेतले. हुंडाणावळीच्या दरावर जे उलटसुलट मतप्रवाह

(तो दर रूढ होऊन सात वर्षं लोटली तरी) चालू होते ते एकत्रित करून एक निबंध लिहून काढला.

वास्तविक दक्षाला सर्व कांहीं कळत होतं. ती मला या प्रकरणांत जितकं बनवायचं तितकंच बनवीत होती. प्रेम कसं करायचं हें मी शिकत होतों.

नंतर पत्रं, दाखले, भेट दिलेल्या वस्तू, आणाभाका—तपशील खूपच वाढला. परीक्षा जवळ आली तसं वाटायचं कीं हा उगाच पसारा मांडून बसलों.

रिझल्ट लागला आणि इंटरसारखाच यावेळीहि पहिला वर्ग थोडक्या मार्कांनीं मी गमावला.

मध्यंतरी दक्षाचं लग्न झालं. ती भंडाऱ्याला कीं कुठंशी नाहींशी झाली. मी इंग्लंडला गेलों.

तीन वर्षांनीं परत आल्यावर त्या वेळच्या ‘प्रतिभा’ पाक्षिकांत आपल्या नांवानं तिनं प्रसिद्ध केलेल्या माझ्या कांहीं सुधारलेल्या कविताही मीं वाचल्या. हरिभाऊंना विचारून तिचा पत्ता काढावा असा विचारहि माझ्या मनांत आला नाहीं. (संपादकीय एटिकेट म्हणून त्यांनीं तो दिला नसता ही गोष्ट वेगळी!)

माझ्या पहिल्या संग्रहांत या ‘प्रक्षिप्त’ कविता मला बाजूला ठेवाव्या लागल्या. सावधानता म्हणून नवीन लिहितांना शैलीहि मी त्यानंतर थोडी वेगळीच ठेवूं लागलों.

या संग्रहाचं तिच्या नांवानं जेव्हां ‘संजीवनी’त परीक्षण आलं—आणि तेंहि आपल्याला सर्व कांहीं ठाऊक आहे अशा थाटांत—तेव्हां मी बापुरावांना गळ घालून तिचा पत्ता काढला. पूर्वीचं सगळं विसरून आम्ही दोघांनींहि एक चतुराईचा सोयिस्कर पत्रव्यवहार आरंभला.

मध्यंतरींचा हा सगळा इतिहास पुन्हां केव्हांतरी सवडीनं सांगायला हवा...

आज...आज दक्षाचं हें नवं पत्र दहा वर्षांनीं आलं होतं. मी मागचंपुढचं कांहींच जाणत नव्हतों. मला अकस्मात् वाटलं कीं, मी एवढ्या पसाऱ्यांत अगदीं पहिल्यासारखाच एकाकी आहें. दक्षा खिडकींत उभी आहे आणि माझी वॅबिंग्टन-स्मिथच्या सबंध कमिटीशीं झटापट चालू आहे.

हॅमिल्टन हॉटेल सांपडायला मला चांगला पाऊण तास लागला. ही जागा दक्षानं मुद्दाम कां निवडावी तेंहि कळलं नाहीं. मी गेलों तेव्हां दक्षा नव्हती. त्यामुळंच कीं काय, उगाच एक माझ्या मनावरचं ओझं कमी झालं.

मला दाखविलेल्या एका अर्धवट उजेडाच्या लाउंजमध्यें मी तिची वाट पहात बसलों. ती केव्हां येईल तें कुणीच सांगूं शकत नव्हतं.

दक्षा एकटी आलेली नव्हती—हें थोड्या संशोधनांतीं मला कळलं. बरोबर तिचीं दोन्ही मुलं होतीं. बाहेर जाऊन कांहीं चॉकोलेट-टॉफी आणून ठेवावी असा एक विचार आला. पण तितक्यांत ती येऊन गेली तर पंचाईत होईल म्हणून तो लगेच सोडून दिला.

बऱ्याच वेळानं दक्षा आली. मोठ्या मुलीला तिनं उचलून घेतलं होतं. धाकटा—चार वर्षांचा—एक मोठं कागदाचं बॉक्स घेऊन मागून येत होता. तिच्या गळ्यांतील बॅगवजा पर्संहि चांगलीच जड होती.

चंदाला ताप आलाय, ऊन बाधलंसं दिसतं, असं म्हणत ती जिन्याकडेच गेली. मी उठून तिच्या मागोमाग गेलों. मुलाला

उचलून घ्यावं तर तो घेऊं देईना. त्याला वाटलं, मी त्याच्या हातांतलं बॉक्सच घेतों आहें. चंदाला मागून घ्यायचं मात्र भान राहिलं नाहीं. दक्षा झपझप वर चढून गेली सुद्धां.

तिच्याकडून चावी घेऊन मी खोलीचं दार उघडलं. खोली लहानशीच होती. कॉटवर चंदाला ठेवून तिनं मला बसायला सांगितलं. मुलाच्या हातांतलं बॉक्स घेऊन टेबलावर ठेवलं. त्याला मुंबईच्या काकाला नमस्कार करायला सांगितलं. त्यानंहि झटपट नमस्कार केला—नातं प्रस्थापित केल्यावर त्याचा विश्वास बळावला असावा. आपण खालीं जेवायचं सांगून येतें म्हणून दक्षा गेली.

एव्हांना सात वाजून गेले होते. बाहेर चांगलाच अंधार पडूं लागला होता.

मी उठून चंदाच्या डोक्याला हात लावून पाहिला. ती चांगलीच तापानं फणफणली होती. बिट्टू पद्धतशीरपणं आपले कपडे काढून नाइट सूट घालायला लागत होता.

मी लगेच खालीं गेलों. दक्षाला सांगितलं, हें कांहीं खरं नाहीं. टॅक्सी घेऊन येतों, तुम्हांला सगळयांना घरीं न्यायला. ती कांहींच बोलली नाहीं. तिला सामान आवरून तयार रहायला सांगितलं.

पुढचा इतिहास अगदीं थोडा आहे. चंदाचा ताप उतरायला तीन दिवस लागले. तिन्ही रात्री आम्हीं दोघांनीं जागून काढल्या.

बिट्टूची आणि माझी चांगलीच दोस्ती झाली. चंदा बरी झाल्यावर जायच्या दिवशीं तो मला जो बिलगला तो खालीं उतरेनाच.

सगळं झाल्यावर दक्षा म्हणाली कीं, ती आपल्या कविता-संग्रहासाठीं एका प्रकाशकाला भेटायला आली होती. मीं म्हटलं,

"हें एवढंच होतं तर मला आधीं कां नाहीं सांगितलंस?" ती हंसली आणि थोड्या वेळानं म्हणाली, "पण आतां त्याची जरुरी नाहीं. मी सगळं बाडच सकाळीं तुम्ही गेल्यावर बंबांत टाकून दिलं."

मीहि तिचे दोन्ही हात हातांत घेत म्हटलं, "मी तरी कुठं लिहितों आहें अलीकडे? सगळं सोडून दिलं आहे."

## साक्ष

आज मागची आठवण यत्किंचितहि द्यायची नाहीं असं मी ठरवलं आहे. त्याच घटनांना उजाळा देण्यांत काय अर्थ आहे? मला त्यांत कोणतंच स्वारस्य वाटत नाहीं.

म्हणजे मागची आठवण आतां विसरायला हवी,—मला. तूं ती विसरली आहेस असं मी समजतों. त्याशिवाय का इतक्या निर्विकारपणानं हें सारं जग चाललं असतं?

स्त्रिया धूर्त असतात. धूर्त होणं त्यांना भागच असतं. आयुष्यांत त्यांच्यावर इतक्या विविध बाजूंनी गहजब होत असतो कीं, त्या सगळ्यांना तोंड द्यायचं म्हणजे धूर्तपणाचा अवलंब करावा लागतोच.

प्रेम हा धूर्तपणाचाच एक भाग का?

प्रेम!...तूं प्रेम कधीं केलं असशील तर तुला हें समजूं शकेल.

तुला हें समजूं शकेल असं मी समजूं शकतों.

(मीं प्रेम केलं आहे याचा हा एक नवा पुरावा!)

पण तूं धूर्त कधींच नव्हतीस. कांहीं गोष्टी तुला समजतच नव्हत्या. अगदीं तशा त्या अवस्थेंतही पाहतांक्षणींच नेटवून देणारी आतुर लालसा मला तुझ्या दृष्टींत कधींच भेटली नाहीं. केवळ तृप्ति...

आणि केवळ करुणा.

करुणा ही प्रेमाची अनादिकालापासून वैरीण आहे.

तुला समजलं नव्हतं कीं मला हें सारं समजलं आहे.

तुझ्या हृदयांत आहेत दोन अमोघ शक्ती. एक सगळीकडे हाहाःकार उडवून देते आणि दुसरी सगळं तुला हवं तसं राखून घेते.

म्हणून मी तुला अजून नांव ठेवूं शकलों नाहीं.

तुझा सहवास, तुझा विचार म्हणजे एक वावटळ. आणि मी स्थाणुकाय वृक्ष.

मी वांकलों नाहीं, तें माझं प्रेम.

तुझ्यावर मी एक रूपक रचलं आहे. त्यांत सोयीसाठी मी स्वतःकडे तुझी भूमिका ठेविली आहे.

त्यामुळं एक मात्र झालं कीं, मला त्यांत कुठंच अवसर मिळाला नाहीं.

"आरस्पानी पाण्यांत मी मला पहात असतें नार्सिससारखी. माझं गात्र न् गात्र इतकं रेखीव आणि कांतिमान असतं कीं, त्यांचं शारीर रूपच मी विसरून जातें. इतक्या अमाप लावण्याचा मी सांठा करतें. मी अगदीं संतृप्त असतें. मला कांहींच नको असतं. मला कशाची आठवणहि राहात नाहीं."

ही तूं.

मी असतों रात्रंदिवस जळत.

तुला ठाऊक नव्हतं तेव्हांपासून मी तुला माझी केली आहे.

ही माझी तऱ्हा. ही सगळ्या जगाची तऱ्हा.

तूं आहेस जगावेगळी.

तूं कधींच कांहीं शिकली नाहींस का? की तुला त्याची जरूरच भासली नाहीं?

बीज आपणांतच सबंध वृक्षाचा विस्तार सामावून असतं, म्हणून त्याला स्वयंपूर्ण म्हणतात.

तूंहि तशीच आहेस.

घेतलंस तर घेतेस—स्वखुषीनं आणि स्वतःसाठीं देणं तुझ्या लेखीं नाहीं. तुझा तो धर्मच नाहीं. तुझा आविष्कार, तुझं विकसन याला तुझ्या दृष्टीनं कांहीं अर्थच नाहीं. तें सारं *तुझं* हें मुख्य, महत्त्वाचं.

मला हें केव्हां समजलं ?

मला हें कसं समजलं ?

(हें जाणून घेण्याची वास्तविक तुझी अपेक्षाहि नाहीं !)

...मी जेव्हां तुला टाळायला लागलों तेव्हां.

पण करुणा म्हणजे प्रेम नाहीं, तशीच भक्ति म्हणजेहि प्रेम नाहीं.

प्रेम हें दाहक असतं. परवश असतं. दुसऱ्याचं दुसरेपण नाकारणारं असतं.

शिवाय तुझ्यांत असं काय होतं कीं, मीं इतक्या दुरूनहि तुझं रूप आठवावं ?

आधीं मी तुला दूर जायला देतां कामा नये होतं. तूं गेल्यावर तुझ्यामागं यायला हवं होतं. तुझ्यापाशीं कशाहि परिस्थितींत रहायला हवं होतं.

काळ किती कसा अचल असतो पहा !

जें होऊन गेलं तें आतां पटत नाहीं. जें होतं आहे तें व्हायला नको असं सारखं वाटत असतं. जें व्हायला हवं तें नक्की होणार नाहीं याची मनोमन खात्री असते.

पण आज यांतून माझी अचानक सुटका झाली आहे.

मी …

मी आतां तुझा विचारच कर…

मी आतां माझाहि विचार करीत नाहीं.

निर्णय घ्यायलाच नेहमीं किती वेळ लागतो पहा !

*मनींची मी आज । मुक्त चंद्रावळ*

*भोगिली अकाळ । हीच साक्ष*

55429
11.11.76



Library IIAS, Shimla
H 891.46 R 261 M
00055429

'फुलाच्या अगदीं गाभ्यांत जाण्याचा प्र
नुसती पोकळी असणार आणि ती त फुलानं
सौभाग्य आहे.' हा इशारा जसा रसिकाला, तसाच तो फुलालाहि समजायला पाहिजे. फूल, त्या फुलाचं विश्व, हें सगळं ज्याच्या हृदयांत नटून उभं आहे त्याच्यासाठींच ही अनामिक पोकळी आहे.